दादा-तात्या

एक निस्सीम भावबंध



सुभाष धारणकर

आजोबा – मार्तंड बाबा

विष्णूपंत (दादा) – शांताबाई (आई)



रुक्मिणी – मधुकर

यशोदा–भास्कर

दिनकर – सुभद्रा

तारामती

कुमुदिनी

सुमन

लतिका



सुभाष –सुनीता

दादा-तात्या : एक निस्सीम भावबंध

या चरित्राचे ई पुस्तक ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना ई स्वरुपात विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान लेखक श्री सुभाष धारणकर यांचे आभारी आहे.

या पुस्तकाचे ई प्रकाशन व विनामूल्य वितरण करण्यास परवानगी दिल्याबद्दल आम्ही या पुस्तकाचे प्रकाशक रफ़ल्स पब्लिकेशन सर्व्हिसचे आभारी आहोत.

या पुस्तकावरील आपले अभिप्राय श्री सुभाष धारणकर यांना subhashdharankar@gmail.com या ई पत्त्यावर कळवावे.

धन्यवाद

सुनीळ सामंत

टीम ई साहित्य

esahity@gmail.com

www.esahity.com

Whatsapp- 9987737237(अशीच विनामूल्य पुस्तके नियमित मिळत रहाण्यासाठी आपले नाव व गाव व्हाट्स अप करा)

दादा - तात्या

एक निस्सीम

भावबंध

सुभाष धारणकर

रफल्स पब्लिकेशन सर्व्हिस, पुणे

दादा - तात्या- एक निस्सीम भावबंध

पहिली आवृत्ती
ऑक्टोबर २०२५

प्रकाशक
रफल्स पब्लिकेशन सर्व्हिस,
पुणे ४११०३८

मुद्रक
गिरीश सांगळे
पुणे ४११०३८

मुखपृष्ठ : साज सरगम,
पुणे

लेखक
सुभाष धारणकर
बी-४, फ्लॅट क्र. ६०१,
लेक टाऊन, बिबवेवाडी,
पुणे ४११०४६
भ्रमणध्वनी: ९४२३००२९५४

विशेष आभार
साहित्य भारती युट्युब वाहिनी,
पुणे

किंमत : US $ 3.00
(रुपये १०० फक्त)

टीप: ह्या पुस्तकातील लेख व मते लेखकाची स्वतःची आहेत. पुस्तकातील मजकूर इतरत्र वापरण्यास हरकत नाही. मात्र पुस्तकाचा उल्लेख जरूर करावा.

ऋणनिर्देश

या पुस्तकाच्या कल्पनेपासून ते प्रत्यक्ष मूर्त स्वरूप येईपर्यंत पत्नी **सौ. सुनिता** माझ्या सोबत ठामपणे उभी राहिली. तिच्या सततच्या प्रेरणेने, पाठबळाने आणि आत्मविश्वास देणाऱ्या सहवासामुळे हा लिखाणाचा संपूर्ण प्रवास सुखकर आणि आनंददायी ठरला.

पुस्तकाची संकल्पना, मांडणी आणि प्रूफ वाचन या सर्व टप्प्यांमध्ये **मेहुणे श्री. अरविंद खडमकर** आणि **परममित्र मोहन नावंदर** यांनी दिलेल्या मोलाच्या मार्गदर्शनामुळे लेखनाला योग्य दिशा आणि सजगता लाभली.

माझी दोन्ही मुले **राहुल व अतुल** तसेच स्नुषा **उल्का आणि माधवी** यांनी अत्यंत बारकाईने प्रूफरीडिंग केले. त्यांच्या या मनापासून केलेल्या प्रयत्नांमुळे संहितेची शुद्धता, स्पष्टता आणि सौंदर्य अधिक खुलून आले. **बंधू रमेश** आणि **सतीश** यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांमुळे व आवश्यक परिपूर्ण माहितीमुळे संपूर्ण लेखन अधिक परिपूर्ण आणि परिपक्व बनू शकले.

या पुस्तकाची मांडणी श्री. चंद्रमोहन हंगेकर यांनी केली, मुखपृष्ठाची संकल्पना श्री. प्रवीण पोटाबत्ती यांनी दिली, छपाईची जबाबदारी भाचा श्री. गिरीश सांगळे याने अत्यंत जबाबदारीने आणि नेटक्या पद्धतीने पार पाडली. त्यांच्या वेळेवर केलेल्या काटेकोर नियोजनामुळे हे पुस्तक आकर्षक, दर्जेदार आणि देखण्या स्वरूपात वाचकांसमोर सादर करता आले. प्रकाशक प्रदीप तुंगारे यांचेही खूप आभार मानतो.

माझे सर्व नातेवाईक, सगे-सोयरे, जिवलग मित्रपरिवार आणि इतर हितचिंतक, ज्यांनी वेळोवेळी दिलेले प्रोत्साहन, पाठबळ आणि विश्वास हा या लेखनप्रवासाचा खरा आधार ठरला, त्यांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे. त्यांच्या या अमूल्य सहकार्याविना हे पुस्तक साकार होणे शक्यच नव्हते. त्यांच्या या निस्सीम योगदानाची कृतज्ञता माझ्या मनात सदैव जपून ठेवीन.

- सुभाष विष्णु धारणकर (सुविधा)

अनुक्रम

१. मनोगत	१
२. प्रस्तावना - अरविन्द खडमकर	२
३. प्रस्तावना – मोहन नावंदर	३
४. दादा आणि तात्या – एक निस्सीम भावबंध	४
५. माझे दादा	४०
६. माझी माय	५१
७. रम्य ते बालपण	६८
८. अण्णांची अमूल्य शिकवण	७३
९. थोर तुझे उपकार	७६
१०. धारणकर वंशावळ	८०

मनोगत



हे पुस्तक लिहिण्याची इच्छा माझ्या मनात अनेक वर्षांपासून घर करून होती; परंतु प्रत्येक वेळी भावनांचा प्रचंड ओघ पाहता लेखनाचा प्रवास थांबायचा. कारण ही केवळ दोन व्यक्तींची कथा नाही, तर अशा दोन जीवांच्या अतूट नात्याची कहाणी आहे, ज्यांची सावलीसुद्धा एकमेकांशिवाय अपुरी वाटायची- माझे वडील *दादा* (विष्णुपंत) आणि त्यांचे लहान बंधू *तात्या* (सीतारामपंत)!

त्यांच्यातील निस्सीम प्रेम, विश्वास, त्याग आणि सहज जिव्हाळा इतका लोभस होता की, त्यांच्या आठवणी जाग्या होताच मन आपोआप भरून येते. त्या भावबंधाच्या अविचल नात्याने आमच्या संपूर्ण कुटुंबाला एकत्र ठेवले, आणि आम्हा सर्वांना प्रेम, आपुलकी आणि संस्कारांचा अनमोल ठेवा दिला.

या लेखनाच्या निमित्ताने, दादा आणि तात्या यांच्या दोन्ही घरांतील स्नेहबंध, परस्पर समजूतदारपणा आणि अखंड एकोपा अधोरेखित करण्याचा माझा मनापासून प्रयत्न आहे. त्यांच्या सहवासातील असंख्य आठवणी आजही मनाच्या कप्प्यात जिवंत आहेत. त्या आठवणींच्या उबदारतेला शब्दांत साकार करण्याची तीव्र इच्छा या पुस्तकामागे आहे. या दोनही थोर व्यक्तिमत्त्वांच्या कुटुंबांतील आपुलकी, जिव्हाळा, परस्पर सन्मान आणि निखळ प्रेम- या सर्व भावना या लेखातून वाचकांपर्यंत पोहोचून त्यांच्या मनालाही त्या उबदार स्पर्शाचा अनुभव द्यावा, हीच माझी मनोमन आकांक्षा आहे.

तथापि, लेखनाच्या प्रवासात अनवधानाने काही त्रुटी राहिल्या असतील किंवा एखादा प्रसंग कुणाच्या भावना दुखावणारा ठरला असेल, तर कृपया मोठ्या मनाने त्याकडे क्षमाशील नजरेने पाहावे. कोणाच्याही मनात गैरसमज निर्माण करणे किंवा दुःख पोहोचवणे हा माझा उद्देश कधीच नव्हता.

- सुभाष विष्णुपंत धारणकर (सुविधा)

प्रस्तावना

"रेशीम गाठ" म्हणजे सहज सुटू न शकणारे, घट्ट बांधलेले नाते. अशाच अविचल बंधांचे भावस्पर्शी चित्रण श्री. सुभाष धारणकर (सुविधा) यांनी या पुस्तकात केले आहे. वडील श्री. विष्णुपंत आणि चुलते श्री. सीतारामपंत यांच्या निखळ आपुलकीसोबतच आई शांताबाई व काकू सुंदराबाई यांच्या प्रेमळ स्नेहबंधांचेही सुंदर दर्शन त्यांनी शब्दबद्ध केले आहे.

हे पुस्तक केवळ दोन घरांचे वर्णन नसून पुढील पिढीला एकत्र कुटुंबव्यवस्थेतील आपुलकी, संकटांना सामोरे जाण्याची जिद्द आणि जुनी जीवनमूल्ये यांची जाणीव करून देण्याचा प्रयत्न आहे. आजच्या मोबाईल-केंद्रित युगात हरवलेली संवादाची ऊब, नाते टिकवण्याची धडपड, एकमेकांसाठी धावून जाण्याची वृत्ती, हे सारे या लेखनातून जाणवते.

लेखकाने दोन्ही कुटुंबांचे वर्णन अगदी सोप्या, प्रवाही भाषेत केले असून 'तुझं-माझं' ही भावना त्यांना कधीच माहीत नसल्याचे प्रत्ययास येते. या भावबंधांना बळ देणारी शांताबाई आणि सुंदराबाई यांची निःस्वार्थ साथही हृदयाला स्पर्शून जाते. निवृत्तीनंतरही लेखकाचे समाजकार्य या संस्कारांचा प्रत्यय देणारे आहे.

पावसाळ्यानंतर संथ, तृप्त नदीप्रमाणे हे शब्दांकन मनाला शांततेची अनुभूती देते. म्हणूनच हे पुस्तक फक्त कपाटात न ठेवता घरातील प्रत्येकाच्या नजरेस सहज पडेल अशा ठिकाणी असावे.

-अरविंद खडमकर, पुणे

प्रस्तावना

बाबू, माझा लहानपणापासूनचा मित्र. ह्या बाल्यमैत्रीला खोली व समज आली ती कॉलेजमध्ये आल्यावर. कष्टकरू, होतकरू, प्रेमळ, मन मिळावू सुभाषला समजण्यासाठी थोडं प्रौढत्व कदाचित गरजेचं होतं.

मी आधीपासून सुभाष असं संबोधन केलं नाही. कारण घरी आई दादा बोलवत त्या प्रमाणे मलाही बाबू म्हणायची सवय लागली होती. ह्या लेखाच्या सर्व पात्रांना मी जवळून अनुभवले आहे, त्यांच्या बरोबर राहिलो आहे.

पुढच्या पिढीला ह्या लेखनाद्वारे बरंच शिकण्यासारखं आहे. दादा व तात्यानी कुटुंबप्रमुखाची भूमिका कशी असावी, शिस्त व प्रेमळ धाक असावा पण आलेल्या प्रसंगात सगळ्यांना बरोबर कसे घेऊन चालावे हे दाखवून दिले आहे.

दादांनी गीता नुसती वाचली नाही, तर एक कर्मयोग्याप्रमाणे जगले. व्यायाम व शरीर स्वास्थ्य किती आवश्यक असते, हे देखील त्यांच्या दिनश्चर्येने दाखवून दिले. काम करीत असताना एकाग्रता वाखाणण्याजोगी आहे. कणखर, शिस्तप्रिय, मितभाषी असे दादा आतून किती कोमल होते, देव भोळे नसणारे व वरपांगी नास्तिक दिसणारे दादा किती धार्मिक व देशभक्त होते हे पण वाचूनच समजते.

आई व माया ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत व तिच्या सानिध्यसुखाची गोडी शब्दात व्यक्त करण्याची धडपड ह्या योगे बाबूने केलेली दिसते.

नात्यांनी चुलत असले तरी, वागण्यातून सख्यापेक्षा सरस अशी तात्या व दादांनी मनाच्या धाग्यांनी व हातांनी विणलेली नाती, हे आजकालच्या स्वार्थी व निव्वळ मटेरियल नात्याहुन किती श्रेष्ठ होती, हे वेगळे सांगायला नको. दिवाळी, दसरा व असे सण एकत्रपणे साजरे करून नात्यातली ओल व स्निग्धता जपण्याची पद्धत, किती सुंदर, आनंददायी व समयोचीत आहे, ही पण आज भावंडांसाठी एक शिकवणच आहे. संकटकाळी भाऊच भावाचा असतो, हे आजच्या पिढीचे वास्तव. प्रेरणादायी वास्तवाची सत्यता दाखविणारा आरसा असे हे लेखन आहे. गरिबीत पण श्रीमंती कशी असते व पैसा सर्वस्व नसून नातेसंबंध किती महत्वाचे असतात, हे आपण सर्वांनी ह्यातून शिकायला हवे.

सुभाषने मांडलेली ही गाथा पुढच्या पिढीला समाजात जगण्याची सुयोग्य दिशा दाखवणारी 'सुविधा' बनो !!

-मोहन नावंदर, गोरेगाव, मुंबई

दादा आणि तात्या - एक निस्सीम भावबंध

आजोबा - मार्तंड बाबा

पिताश्री विष्णुपंत मातोश्री शांताबाई

चुलते सीतारामपंत काकू सुंदरबाई

स्मरण दिन

दादा ४ डिसेंबर १९८६ **तात्या १४ फेब्रुवारी १९९४**

आई ११ जुलै २००३ **काकू १० सप्टेंबर २००६**

दादा आणि तात्या – एक निस्सीम भावबंध

माझे वडील, दादा आणि चुलते, तात्या यांचं नातं हे केवळ बंधुभावाचं नव्हे, तर खऱ्या अर्थाने आत्मियतेचा, समर्पणाचा आणि निखळ प्रेमाचा झराच होता. हे नातं केवळ रक्ताच्या नात्याने जोडलेलं नव्हतं, तर त्यात आपुलकी, निष्ठा, समजूतदारपणा आणि परस्पर आदराची गहिरी ओल भरलेली होती. खरं प्रेम म्हणजे काय, याचं मूर्तिमंत उदाहरण पाहायचं असेल, तर त्यांच्या नात्याकडे पाहिलं की मन हेलावून जातं.

आमच्या घराच्या वंशवृक्षात थोडी गुंतागुंत होती. असे सांगितले गेले आहे की, आमच्या मार्तंड आजोबांनी तीन विवाह केले होते, आणि प्रत्येक पत्नीला एक मुलगा होता. परंतु, माझ्या दादांचे आणि तात्यांचं नातं कधीच अपूर्ण वाटलं नाही. त्यांचं नातं इतकं घट्ट आणि सच्चं होतं की आम्हा मुलांना कधीच जाणवलं नाही की, हे दोन वेगवेगळ्या मातांकडून जन्मलेले बंधू आहेत. ते एकाच पोटचे नसले तरीही, एकाच काळजातून उमललेले वाटायचे. हीच त्या घरातल्या संस्कारांची खरी ताकद होती.

दादा (विष्णूपंत) आणि तात्या (सीतारामपंत) –"*दादा आणि तात्या – दोन शरीरं, पण एकच जीव!*" रोज एकमेकांना न भेटता त्यांचा दिवस पूर्णच होत नसे. त्यांच्या मैत्रीचं, बंधुतेचं हे नातं म्हणजे राम-लक्ष्मणाच्या प्रेमाची आठवण करून देणारे होते – निर्मळ, नि:स्वार्थ आणि निस्सीम!

त्यांचे संवाद, विचारविनिमय, सल्लामसलत – हे सगळं इतकं सखोल आणि एकजीव होतं की, घरातील कोणताही निर्णय – तो मोठा असो वा लहान – एकमेकांच्या सल्ल्याशिवाय कधीच घेतला गेला नाही. तात्या नेहमी दादांना "भाऊ" म्हणत, आणि ते संबोधन त्यांच्या नात्याला आणखी एक गोड स्पर्श देत

असे. तात्यांचं घर माझ्या दादांना **'मोठे बाबा'** म्हणून म्हणायचे . त्याचप्रमाणे, माझ्या आईला त्यांची **'मोठी आई'** म्हणून मान दिला जात असे. ही भावनाच केवळ नात्याची ओळख नव्हती, तर त्या नात्यांचं श्रद्धास्थान होतं.

खरंतर, आमचं घर आणि तात्यांचं घर – ही दोन वेगळी घरं नव्हतीच. मोठ्या गोष्टी असो वा छोट्या, बहुतेक निर्णय दिनकर अण्णांच्या सल्ल्यानेच घेतले जायचे. ते दोन्ही घरांसाठी आधारस्तंभ होते – शांत, संयमी, आणि समजूतदार.

ही कुटुंबाची गुंफण इतकी घट्ट होती की त्यात प्रत्येक जण आपली भूमिका पार पाडत होता. कधी थेट, कधी पडद्यामागे, पण सगळ्यांच्या उत्कर्षासाठी, पुढे जाण्यासाठी सदैव प्रयत्नशील.

दादा आणि तात्या यांचं नातं केवळ भाऊ म्हणून नसून, हृदयाच्या एका अदृश्य पण अतूट नात्याने जोडलेलं होतं. रोजच्या आयुष्यात ते एकमेकांची नियमित विचारपूस करत, अगदी साध्या शब्दांत स्नेहाने हालहवाल विचारत. त्यांच्या संवादाला कोणतंही खास कारण लागत नसे. ती संवादाची गरजच आपुलकीतून निर्माण व्हायची.

मोठे भाऊ म्हणजे दादा जर काही वेळ नजरेआड गेले, तर धाकटे तात्या अस्वस्थ व्हायचे. त्यांच्या नात्यातील ही जिव्हाळ्याची सहजता मनाला स्पर्श करून जायची.

दादांचं व्यक्तिमत्त्व म्हणजे *स्थैर्य, निग्रह आणि शिस्तीचं जिवंत उदाहरण*. सावळा वर्ण, स्थिर नेत्र, आणि शांततेतूनही ठामपणे झळकणारा आत्मविश्वास – त्यांचं व्यक्तिमत्त्व कुणालाही भारून टाकावं असं होतं. त्यांचा वेश अगदी साधा पण अत्यंत नीटनेटका असायचा – कपाळावर उभा गंध, बटणाचा

अंगरखा, आतील बंडी, सुटसुटीत काठाचं धोतर, डोक्यावर पांढरी टोपी आणि पायात चपला. या सगळ्या गोष्टी केवळ त्यांच्या बाह्यरुपाचाच भाग नव्हत्या, तर त्यांच्या स्वभावाची, त्यांच्या जगण्याची शांत, संयमित आणि सुसंस्कृत जाणीव त्या वेशात उतरलेली असे.

सहवास, समर्पण आणि स्नेह – दादा-तात्यांची कथा

एक काळ असा होता की, तात्या आणि दादा दोघंही एकत्र राहत होते. तात्यांचं लग्न झालं, मुले झाली, संसार वाढू लागला – तेव्हा त्यांना आपली वेगळी व्यवस्था करावी लागली. जरी दोन घरे वेगळी झाली तरी मने मात्र कधीच वेगळी झाली नाहीत. एकमेकांच्या घरातील सुखदुःखही त्यांनी आपापली जबाबदारी मानली. कोणत्या घरात काय सुरु आहे, कोणाला काय हवं, कोणाला मदतीची गरज आहे – यावर त्यांचे बारीक लक्ष असायचं.

तात्या संपूर्ण कुटुंबासह आधी रंगार गल्लीतील लक्ष्मीनारायण मंदिराजवळ राहायला लागले. १९५६ च्या पुरानंतर पाटणकर (गंगूबाई) यांच्या वाड्यात काही काळ त्यांनी वास्तव्य केलं, आणि शेवटी साळीवाड्यात आमच्या घरासमोरच कायमचं स्थायिक झाले. हे सारं जणू काही नियतीनेच ठरवलं होतं—की त्यांना थोरले बंधु दादांच्या जवळच, सहवासात राहायला मिळावे. इतकंच काय, रोज एकदा तरी एकमेकांना पाहिल्याशिवाय, भेटल्याशिवाय त्यांचा दिवसच पूर्ण होत नसे !

तात्यांना ऑइल इंजिनचे तंत्रज्ञान अवगत होतेच, पण त्यासाठीच्या फाऊंडेशन रचण्यात, म्हणजे इंजिन नीट, स्थिर आणि कार्यक्षम बसवण्यासाठी आवश्यक असलेल्या भक्कम पायाभरणीच्या कामात, त्यांचा विशेष हातखंडा होता. त्यांच्या सल्ल्याशिवाय आणि सहकार्याशिवाय इंजिनची स्थापनाच होत

नसे. माझे थोरले बंधू मधुकर काही काळ तात्यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम शिकले. नंतर जेव्हा ते सिन्नरला स्थायिक झाले, तेव्हा त्यांनीही तेथे इंजिन दुरुस्तीचा व्यवसाय सुरू केला.या साऱ्या प्रवासात तात्यांची मेहनत, दादांचे मार्गदर्शन आणि दोघांचे परस्पर विश्वासाचे नाते सतत जाणवत राहते.

सकाळी न्याहारी करून तात्या बाहेर पडत. संध्याकाळीच नव्हे, तर अनेकदा रात्री उशिरा घरी परतत. दादा ते येवोतोपर्यंत त्यांच्या वाटेकडे डोळे लावून बसलेले असत. तात्यांनी दिवसभर काय केलं, कोठे गेले, काय खाल्लं, या सगळ्या गोष्टींची चौकशी दादा काळजीने करत. तात्या घरी परतल्याशिवाय दादा जेवणाच्या पानाला हात लावत नसत.

तात्या खेडोपाडी ऑइल इंजिनच्या दुरुस्तीच्या कामासाठी जात असत. तेव्हा कधी मोबदल्यात, तर कधी वानवळ्याच्या (नमूना) स्वरूपात जेंव्हा त्यांना भाजीपाला, धान्य, पिठं, डाळी, रानमेवा अशा गोष्टी मिळत. तेंव्हा त्या वस्तूंचे तात्या अगोदरच दोन वाटे करून आणत . त्यातला एक वाटा आमच्या घरी म्हणजे थोरल्या घरी त्यांच्या घराअगोदरच पोहोचत असे नंतर उरलेला वाटा ते स्वतःच्या घरी घेऊन जात. ही गोष्ट त्यांच्या मनात असलेल्या घरगुती एकतेची आणि आपलेपणाची साक्ष होती.

असे समजले की, तात्या अगोदर पुण्यात Ammunition फॅक्टरी मध्ये नोकरीस होते. त्या नोकरीत त्यांना खूप त्रास होवू लागला म्हणून त्यांनी ती नोकरी सोडली आणि संगमनेर येथे परत आले. दादाही विणकर संघामध्ये शिक्षक म्हणून नोकरीस होते. पण, त्यांनीही काही कारणाने नोकरी सोडली आणि आपल्या वडीलोपार्जित विणकाम या व्यवसायास त्यांनी जुंपून घेतले. (नंतर चांगली नोकरी सोडल्याचा पश्चाताप होतो असे ते सांगायचे) तात्यांनी आपल्या पुढील कष्टमय जीवनाची सुरुवात गावापासून दूर असलेल्या एका

मळ्यातील पीठाच्या गिरणीपासून केली. त्यानंतर त्यांनी किर्लोस्कर ऑइल इंजिनच्या दुरुस्तीच्या व्यवसायात आपले कौशल्य ओतले. या कामासाठी त्यांना अनेकदा खेड्यापाड्यांमध्ये जावे लागायचे. आठ-आठ दिवस घरापासून दूर राहावे लागे. अशा वेळी दादा त्यांच्या संसाराची जबाबदारी आपुलकीने सांभाळत. तात्यांच्या घरातील प्रत्येक बाबतीत दादांचे बारीक लक्ष असे, जणू स्वतःचा संसारच !

त्या काळातील साधेपणातली श्रीमंती, संकटातली एकता, आणि नात्यांमधला ओलावा आजही माझ्या हृदयात खोलवर जपलेला आहे – *तात्यांच्या आठवणींमध्ये गुंफलेला, सुगंधित झालेला.*

या दोन भावांची ही अपूर्व, हळुवार आणि नितळ प्रेमकथा आमच्यासाठी आजही प्रेरणादायक आहे – एका काळातल्या, पण काळाच्या पुढे जाणाऱ्या बंधुभावाची! ज्यातून आम्हाला जीवनात माणुसकी, समर्पण व नात्यांची खरी व्याख्या कळली.

तात्या थोडेसे उजळ वर्णाचे, चेहऱ्यावर सतत प्रसन्नता आणि उत्साह. *सफेद, स्वच्छ नेहरू शर्ट-पायजमा*, त्यावर तांबडे बूट आणि पांढरी टोपी, कपाळावर उभा गंध —हा त्यांचा नेहमीचा पेहराव. मोकळा वावर, गाठीशी विनय आणि चेहऱ्यावर आत्मीय हास्य असायचं. तात्यांचा स्वभाव अधिक मनमिळावू, थोडा कलासक्त, थोडा भावनाशील होता. टापटीप वाखाणण्या जोगी ! सर्वांशी आदराने "अहो जाओ"च्या भाषेत बोलणे ही दोघांचीही खासियत होती. तात्यांना *चित्रकलेची विशेष आवड* होती. मंदिरांतील मूर्ती रंगवण्याचं काम ते केवळ हौसेनेच नव्हे, तर श्रद्धेने करायचे. मला त्यांच्या या मूर्ती रंगवण्याचे कामात बऱ्याच वेळा सहभागी होण्याची संधी मिळाली तेव्हा,

त्यांच्या कुशल हातांनी मूर्तींना रंग चढताना मी त्यांच्या डोळ्यांत सौंदर्यदृष्टीचं, श्रद्धेचं आणि कलाप्रेमाचं अद्भुत दर्शन अनुभवलं.

तात्या आणि दादा दोघेही *कुस्तीचे शौकीन, पोहण्यात पटाईत* होते. दोघांचाही नियमित *तालमीत व्यायाम* करायला आणि प्रवरेवर पोहायला जाण्याचा दिनक्रम ठरलेला. शरीरसंपन्नता ही केवळ बाह्य नव्हे, तर त्यांच्या आत्मविश्वासाची आणि कार्यक्षमतेची साक्ष होती. या त्यांच्या दिनचर्येचा प्रभाव आम्हा लहानांवरही पडला होता.दादा आणि तात्यांमध्ये 'मोठा-धाकटा' असं पारंपरिक विभाजन कधीच जाणवलं नाही. दादा मोठे असूनही त्यांचं वागणं नेहमीच प्रेमळ, समंजस, आणि जबाबदारीनं भरलेलं असायचं. *तात्यांच्या संसाराचं भान* दादांनी नेहमी जिव्हाळ्यानं ठेवलेलं. आणि त्याला उत्तर म्हणून *तात्यांनीही दादांप्रती कधीच कमी न होणारा आदर, प्रेम आणि निष्ठा* जपली. हे नातं केवळ रक्ताचं नव्हतं, तर त्या जणू *एका आत्म्याच्या दोन छटा* होत्या – सशक्त, निस्सीम आणि आयुष्यभर टिकणारं.

दादांच्या हातमागावरील सततच्या कामामुळे पाठी-कंबरेत बऱ्याच वेळा उसण भरायची की, त्यावेळची त्यांची अस्वस्थता दिसताच तात्या क्षणाचाही विलंब न करता धावत येत आणि काळजीने पूर्णपणे व्याकुळ होत.

तर तात्या हे अत्यंत मितभाषी आणि मृदू स्वभावाचे होते. त्यांच्या बोलण्यात कधीच अरेरावी नसायची. आणि त्यांच्या शांतपणातही एक अद्भुत प्रभाव होता. आपल्या कामात ते निपुण होते. कोणतेही कार्य असो, ते मन लावून, काटेकोरपणे आणि शांतपणे पूर्ण करत.

तात्यांचे घरातील प्रत्येक व्यक्तीशी प्रेमळ आणि आपुलकीचे नाते होते. मोठमोठ्या शब्दांपेक्षा त्यांच्या कृतीतूनच ते आपलेपणा दाखवायचे. गरज

पडल्यास ते वेळेवर मदतीस येत आणि न बोलता हातभार लावत. हेच त्यांचे प्रेम व्यक्त करण्याचे अप्रतिम माध्यम होते.

मात्र नंतर काही कारणाने ऑइल इंजिनच्या दुरुस्तीचे हे काम तात्यांना मान्य नव्हते. तेव्हा त्यांनी एका ठिकाणी 'मुनीमजी' म्हणजेच कारकूनाचे काम स्वीकारले.

माझ्या वयाचा सोमनाथ आणि धाकटा सतीश – या दोघांविषयी तात्या नेहमीच तोंडभरून, अभिमानाने बोलायचे. सोमनाथ कॉलेजमध्ये शिकत असताना त्याला मार्केट कमिटीमध्ये मिळालेलं काम, त्यातून संसाराला मिळालेला आधार आणि सतीशने इतर सर्व भावांच्या पाठिंब्याने सुरू केलेला पावभाजीचा व्यवसाय — या दोन्ही गोष्टी तात्या आणि काकूंच्या आवडीच्या, अभिमानाच्या गप्पांचा कायम भाग असायचा.

तात्यांचे थोरले जावई बापूसाहेब दातरंगे आणि प्रभाताई यांच्याकडून आम्हाला नेहमीच विशेष प्रेम आणि सहकार्य मिळाले . त्यांच्या नजरेत, त्यांच्या कृपेच्या स्पर्शात, प्रत्येकाचे भविष्य उजळवण्याचा अदृश्य जादूचा प्रवाह असायचा. त्यांच्याकडून मिळालेला प्रेमाचा आणि मार्गदर्शनाचा आधार इतका खऱ्या अर्थाने अमूल्य होता की त्याचा प्रभाव आयुष्यभर जाणवत राहिला.

याच कृपेच्या जोरावर सुरेश आणि रमेश, तसेच माझा थोरला भाऊ भास्कर यांना सहकारी बँकेत नोकरी मिळाली. सोमनाथ आणि मंगल यांना सुद्धा सरकारी खात्यात स्थिर नोकऱ्या मिळू शकल्या. त्या नोकऱ्यांमुळे केवळ आर्थिक स्थैर्य मिळालं नाही, तर प्रत्येकाचे जीवन नक्कीच सुखसमृद्ध बनलं. मलाही त्यांच्याकडून वेळोवेळी मिळालेला मोलाचा सल्ला जीवनात अनमोल ठरला. कठीण प्रसंगी निर्णय घेण्यासाठी, अडचणींवर मात करण्यासाठी किंवा

नवीन संधींचा शोध घेण्यासाठी त्यांच्या शब्दांचा आधार सदैव मिळाला. “धीर धर, संयम ठेवा, प्रयत्न कधीही वाया जात नाहीत,” असं त्यांचे नेहमीच सांगणे असे.

दातरंगे दाजींचे प्रेम आणि मार्गदर्शन केवळ आर्थिक किंवा व्यावसायिक यशापुरतं मर्यादित नव्हते; त्यांनी आम्हाला जीवनात नीतिमूल्य, संयम, चिकाटी आणि इतरांसाठी आदर यांचं महत्व शिकवलं. त्यांच्या सहकार्यामुळे आणि अनुभवाच्या ठशामुळे कुटुंबातील प्रत्येकाचा आत्मविश्वास वृद्धिंगत झाला. आजही जीवनात कठीण प्रसंगांना सामोरे जाताना त्यांची स्मृती मनाला धीर देते आणि पुढे जाण्याची ऊर्जा देत राहते.

तात्यांची पत्नी – आमच्या काकू – सुंदराबाई हळुवार, गोड आणि शांत, अबोल स्वभावाच्या होत्या . तर माझी आई - शांताबाई देखील तितकीच प्रेमळ, पण ठाम आणि आत्मविश्वासू बोलक्या स्वभावाची . दोघीही अत्यंत सुंदर होत्या. दोघींची नावे आपापल्या नावाला सार्थ होती. त्या दोघी जणू सख्या बहिणींच्या नात्यात रमल्या होत्या. त्यांच्यातील संवाद हा आपुलकीचा, मायेचा, स्नेहाचा ओलावा घेऊनच असायचा. आर्थिक परिस्थिती कधीच या स्नेहाला आडवी आली नाही. दोघींचाही स्वभाव करारी होता – परंतु त्या करारीपणातही मायेची झाक होती. गरज पडली, तर एकमेकींसाठी काहीही करायला त्या सदैव तयार !

मला आजही स्पष्ट आठवतंय- तात्यांचा लाडका नातू शेखर लहान असताना तात्या त्याला कडेवर घेऊन आमच्याकडे, दादांना भेटायला यायचे. त्या छोट्याशा शेखरसाठी तात्यांच्या हातात नेहमी काही ना काही असायचं. पण विशेषतः त्यांच्या हातात असायचं शेखरचं आवडतं फळ, पौष्टिक केळं. त्या एका साध्या केळातूनसुद्धा तात्यांचं प्रेम, जिव्हाळा आणि काळजी अगदी जाणवायची. त्या क्षणांमध्ये नात्यातला ओलावा, जिव्हाळ्याची उब आणि साधेपणातली संपन्नता एकत्र अनुभवायला मिळायची. दादा-तात्यांचं हे अनोखं, निरलस आणि हळुवार नातं आजही आमच्या मनात एका विलक्षण आदर्शाच्या रूपात जिवंत आहे. ते एका विशिष्ट काळात घडलेलं असलं, तरी त्यांचं प्रेम काळाच्या मर्यादा ओलांडून पुढे गेलेलं आहे.

सण-उत्सवांच्या उबेतले बंध

आमच्या दोन्ही घरांतील — तात्या आणि दादांच्या कुटुंबांतील — सगळे सण नेहमी एकत्र साजरे होणं हीच आमच्या नात्यांची खरी ओळख होती. दसरा, दिवाळी, संक्रांत, गुढीपाडवा, होळी, गणपती... प्रत्येक सण हा केवळ कॅलेंडरवरील तारीख नसून आमच्या नात्यांना पुन्हा उजाळा देणारा सोहळाच असायचा. त्यातही दिवाळी पाडव्याचा दिवस तर आमच्यासाठी खास जादू घेऊन यायचा.

सकाळी पहाटेपासूनच घरात वेगवेगळ्या फराळाच्या गोडसर वासाने अंगण सुगंधी होत असे, करंज्यांचा तळलेला सुवास, लाडवांच्या वेलचीचा दरवळ, शंकरपाळ्यांच्या कुरकुरीत गंधाने संपूर्ण घरच एखाद्या गोड मेजवानीत न्हाल्यासारखं वाटायचं. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद खुललेला असे. मोठ्यांपासून लहानांपर्यंत सगळेच नटून–थटून, हसतमुखाने पाडव्याच्या ओवाळणीसाठी जमलेले असायचे.

आम्हा भावंडांना एका रांगेत बसवलं जाई, तर समोर भगिनींची रंगीबेरंगी रांग उभी राहत असे—कोणाच्या केसात गजरा, कोणाच्या कपाळावर आकर्षक टिकली, डोळ्यांत लाडाची चमक. त्या क्षणी घरभर जणू नात्यांचा सुवास दरवळत असे. आणि मग दिनकर अण्णा त्यांच्या खिशातून हळुवार एक छोटंसं पाकीट बाहेर काढत. त्या पाकिटातून बाहेर डोकावणारी चकाकती एक रुपयाची कोरी, कडक नोट पाहून आमच्या डोळ्यांत चमक दिसायची .

आजच्या हिशोबाने ती रक्कम किरकोळ वाटेल, पण त्या काळी त्या नोटेतलं मोल केवळ पैशाचं नव्हतं. तो होता प्रेमाचा ओलावा, आपुलकीचा शिरकाव आणि घरभर दरवळणाऱ्या आपलेपणाचा सुवास. भगिनी ती नोट हातात घेताना ज्या कृतज्ञतेने हसत,लाजत त्यात एक अनमोल जपलेपण दडलेलं असे. ती छोटीशी ओवाळणी आम्हाला दरवर्षी नात्यांच्या गोड गाठी पुन्हा घट्ट बांधून देत असे.

दिवाळी जवळ आली की फटाक्यांची खरेदी हा आमच्या घरचा हमखास सोहळाच असे. संध्याकाळी आम्ही सगळे – मोठे लहान मिळून बाजारात निघायचो. कोणाला भुईनळ्या हव्या, कोणाला सुतळी बॉम्ब, कोणाला रंगीत फुलबाज्या, तर कोणाच्या यादीत सापाची गोळी, पॉप्स, अगदी छोटी पिस्तुलीसारखे फटाकेसुद्धा असायचे . कोणते घ्यायचे, किती घ्यायचे यावरून मात्र नेहमीच हलकीशी चढाओढ व्हायची, कधी टोमणे, कधी रुसवेफुगवे, तर कधी हशा.

पण शेवटी सगळे मिळून एकत्र साठा करण्याचा निर्णय ठरायचाच. बाजारातून परतल्यावर मोठ्या उत्साहाने त्या फटाक्यांचे गट्ठे उघडले जात. मग त्यांची मोजदाद सुरू व्हायची—भुईनळ्या, फुलबाज्या, लवंगी, अनार, भोपळे... प्रत्येकाची बरोबरीने मोजणी होत असे. एकूण साठा तयार झाला की, तो अगदी न्यायाने समान भागांमध्ये वाटून दिला जाई.

आपापला वाटा मिळताच आम्ही तो जणू खजिन्यासारखा जपून ठेवायचो. कुणी डबीत, कुणी कपाटाच्या गुप्त कोपऱ्यात, तर कुणी उशीखाली—कोणाचा फटाका कोणाला दिसू नये म्हणून प्रत्येकाची स्वतःची लपवणूक ! मग सुरू व्हायची ती अंधाराची आतुर वाट.

सूर्य मावळायला लागला की खिडकीतून बाहेर डोकावत आम्ही क्षणाक्षणाची मोजदाद करत बसायचो. आणि जशी संध्या गडद व्हायची, आकाशात पहिले तारे चमकू लागत, तसे पहिल्या फटाक्याचा ठिणगीदार "ठोssssक!" आवाज घराघरांतून घुमताच आमचा आनंद अक्षरशः आभाळ फोडून उडायचा. त्या क्षणी सगळ्या वाटणी, साठवण आणि रुसवेफुगवे एका क्षणात विसरून जात—उरायचं फक्त रंगीत प्रकाशात उजळलेलं बालपण!

दिवाळीचा फराळ हा आमच्या घरचा जणू दुसराच एक उत्सव असे. फराळ बनवायचा म्हणजे केवळ स्वयंपाक नव्हे, तर सगळ्यांनी मिळून उरकायचं एक मोठं साहसच! आई, काकू, मोठ्या बहिणी यांच्या हातून लाडू, करंज्या, चकल्या, शंकरपाळे असा फराळाचा खजिना तयार होत असे, तर आम्ही लहान मुले गरमागरम शंकरपाळ्यांवर गुपचूप डल्ला मारत असू. करंज्यांचा तळलेला सुवास, लाडवांच्या वेलचीचा गंध आणि भाजलेल्या पोह्यांचा खमंग वास संपूर्ण घरभर दरवळत राहायचा.

फराळ तयार झाला की सगळे मिळून त्याचा आस्वाद घेणं हा एक वेगळाच सोहळा असे. कोणी कोणाच्या ताटात घास टाकतंय, कोणी दुसऱ्याच्या करंज्या चोरून चाखतंय, तर कुणी कुणाचा लाडू जास्त मऊ आहे का यावर न थांबणारी चर्चा सुरू असायची. त्या हसऱ्या गप्पा, खेळकर टोमणे, आणि प्रत्येक पदार्थाची चव घेण्याचा आनंद आजही मनात गोडसरपणे दरवळतो.

दोन्ही घरांमध्ये त्या काळात एक अद्भुत सामंजस्य होतं. सणासुदीच्या दिवसांत—दिवाळी असो, संक्रांत किंवा गणपती—आमच्या घराच्या मोठ्या अंगणात सर्वजण एकत्र जमायचे. आई आणि काकू यांनी प्रेमाने बनवलेले सगळे पदार्थ एका मोठ्या पंगतीसारखे अंगणात मांडले जात. रात्रीच्या चांदण्याच्या मंद प्रकाशात, अंगणात पसरलेल्या सतरंजीवर सगळे मोठे–लहान मंडळी एकत्र बसत, हसत-गप्पा मारत, फराळाचा आस्वाद घेत जेवत असत.

ते जेवण फक्त पोट भरण्यासाठी नव्हते—ते होते नात्यांचा गोडवा चाखण्यासाठी. त्या साध्या, पण हृदयभरून टाकणाऱ्या पंगतींमध्ये एक वेगळंच समाधान असायचं. दिवाळीची ती रंगत, स्नेहाचा तो ओलावा आणि घराघरांत दरवळणारा एकोप्याचा सुवास—याच गोष्टी आमच्या कुटुंबाची खरी संपत्ती होत्या. आजही त्या चांदण्यांच्या मंद उजेडात उजळलेल्या आठवणी काळजाच्या गाभाऱ्यात सोन्यासारख्या झळाळत राहिल्यात.

अठरा जीवांचा एकसंध परिवार

तात्या आमच्या घराजवळ समोरच राहायला आले होते, त्यामुळे आमची जवळीक आणखी वाढली होती. काळ जसजसा पुढे चालू लागला, दोन्हीकडील संसार बहरू लागला, मुलं-मुलींच्या लग्नांमुळे नवीन घरं स्थापन होऊ लागली, तेव्हा देव-देव्हाऱ्याचे वेगळे मंदिर झाले आणि हळूहळू आधीचे

ते एकत्रित सणवार, जेव्हा एकत्र जमून साजरे करायचो, त्यात हळूहळू काही प्रमाणात खंड पडू लागले. ही जरी एक नैसर्गिकच प्रक्रिया असली, तरी त्या बालपणीच्या एकत्रित आनंदाची आणि स्नेहाची आठवण अजूनही मनाला आनंद देणारी आहे. आम्ही सर्व भाऊ-बहीण वयाने जवळजवळ समान, त्यामुळे *खेळ, भांडणं, मस्ती, गुपचूप एकत्र खाणं – हे सगळं* अगदी नैसर्गिकपणे घडायचं.

आम्ही चार भाऊ आणि चार बहिणी, तर तात्यांना दोन मुली आणि चार मुले – म्हणजेच एकत्र मिळून *अठरा जीवांचे जणू एकच, एकसंध कुटुंब*! हे नुसते आकड्यांचे गणित नव्हते, *तर हृदयांनी गुंफलेली एक प्रेमाची रचना होती*. त्या काळातल्या गरिबीच्या, अपुरेपणाच्या पार्श्वभूमीवरही *घरातल्या या अठरा माणसांची ऊब आणि ओलावा* कधीच कमी पडला नाही.कधी वाटलंच नाही की आपण दोन वेगवेगळ्या घरांतील – *घरं वेगळी असली, तरी मनं एकच होती*. नात्यांत स्नेह होता, संवादांत आपुलकी होती, आणि दैनंदिन *जीवनात एकमेकांसाठी तळमळ* होती. गरज पडली, की कोणाचाही हात आपोआप पुढे यायचा. आणि म्हणूनच ही अठरापैकी एकही व्यक्ती *"अडगळीची" नाही, तर "अडचणीला साथ देणारी" होती*.

तात्यांची मुलेही तेवढीच कष्टाळू, जबाबदार. *प्रभाताई, सुरेशभाऊ, रमेश* यांनी लहानपणापासून *विड्या वळणे, शिवणकाम, लहानमोठी कामं* करत कुटुंबाचा भार हलका केला. त्यांचं बालपण जरी काटेरी होतं, तरी त्यांनी कधी नशिबाला दोष दिला नाही, की परिस्थितीसमोर नमतं घेतलं नाही – *त्यांना संघर्षाला शिस्त आणि संयमाने सामोरं जाणं शिकवलं*.

एक प्रसंग विशेष आठवतो – *सुरेशला एकदा आर्थिक अडचणीमुळे शिक्षण सोडण्याची वेळ आली होती*. त्याच्या डोळ्यांत भविष्याचे स्वप्न

फुलण्याआधीच कोमेजण्याचा धोका होता. पण त्याक्षणी *आमच्यातला मोठा भाऊ – दिनकर अण्णा – धीराचा आधार बनून उभा राहिला.*

"तू शिक. पुढचं मी पाहतो." असं म्हणत अण्णांनी त्याला शिक्षणासाठी पुन्हा प्रवृत्त केलं. रमेश सांगतो की, *"दिनकर अण्णा म्हणजे मार्गदर्शन, आधार आणि सकारात्मकतेचा स्रोतच होता."* त्याने दोन्ही घरांतील सर्व भावंडांना नेहमीच योग्य सल्ला, प्रेम आणि वेळीच पाठबळ दिलं.

त्या काळात, दिनकर अण्णांचा आवाज म्हणजे समंजसतेचा शांत निर्णय; आणि त्यांच्या डोळ्यांतील कटाक्ष म्हणजे 'आपण एकटे नाही' याची नितांत शाश्वत जाणीव.

अशा या अठरा जीवांच्या गोतावळ्यात *कधी वाद, मतभेद, की विसंवाद यांना स्थानच नव्हतं* – होती ती *आपुलकीची वीण, आणि कुटुंबाच्या नावाखाली धडपडणाऱ्या प्रत्येकासाठी असलेली आतून येणारी ओढ.*

आज इतकी वर्षं झाली, तरी ती प्रेमाची, स्नेहाची, एकतेची शिदोरी अजूनही मनात ताजी आहे – *तीच खरी आमची घराण्याची संपत्ती आहे.*

चुली जरी दोन घरांत वेगळ्या होत्या, तरी मनं एकच होती. "भांड्याला भांडे लागणे" ही म्हण दोघांच्या संसारात कधी लागूच पडली नाही. एखादी अडचण आली, तर दोन्ही घरं ती अडचण एकमेकांत वाटून घेत. घरातली माणसं एकमेकांच्या मदतीला धावून जात. या साऱ्या सहजीवनात कुठेही बाहेर गाजावाजा नसे. कोणासमोर झुकणे किंवा मदतीची याचना करणे, हे या दोघांच्या स्वभावातच नव्हते. चुली वेगळ्या असल्या तरी मनं मात्र एकसंध होती. "दोघांच्या संसारात दोन चुली असल्या, तरी एकच ऊब होती – प्रेमाची, स्नेहाची, आणि बांधिलकीची! जीवनशैली, विचारसरणी, सवयी—या सर्व

गोष्टीत एक आश्चर्यकारक एकरूपता होती. जणू दोन वेगवेगळ्या घरांत एकच संस्कार संघ बिनधास्त नांदत होता.

दादा-तात्यांचं नातं म्हणजे केवळ एक कौटुंबिक संबंध नव्हता. ते एक उदाहरण होतं – प्रेम, आपुलकी, जबाबदारी आणि समर्पण यांचं जिवंत दर्शन ! त्यांच्या सहजीवनातून, एकमेकांविषयीच्या असलेल्या जिव्हाळ्यातून आम्हाला जे शिकायला मिळालं, ते आम्हा सर्व भावंडांच्या आणि पुढच्या पिढ्यांच्याही आयुष्याचं अनमोल संचित ठरलं. त्याचीच परिणीती म्हणून आम्हाला कधीच तात्यांचे घर चुलत्यांचे आहे असे कधीच वाटले नाही. आम्ही सगळे सख्या भावाबहिणीसारखे एकत्र खात पित होतो, रहात होतो, खेळत होतो, बागडात होतो.

दोन जीवाभावांचे नाते – नि:स्वार्थ सेवेतून प्रकटलेलं

दादांसारखेच माझ्या आईचं आणि तात्यांचं नातंही तितकंच पवित्र आणि मनाला भिडणारं होतं. माझी आई तात्यांना लहान भावासारखी आपुलकीने आणि प्रेमाने बघत असे. एकदा तात्या गंभीर आजारी पडले . त्यांना नगर येथे उपचारासाठी सुमारे एक वर्षभर राहावे लागले. त्यानंतर जेव्हा ते संगमनेरला परतले, तेव्हा आईने त्यांची अगदी मनापासून सेवा केली. परिस्थती बेताची असूनही आईने त्यांच्यासाठी पौष्टिक जेवण, विशेषतः जवसाचे आणि डिंकाचे लाडू बनवले – फक्त ते लवकर बरे व्हावेत म्हणून ! हे केवळ कर्तव्य नव्हतं, तर नात्याची, मायेची आणि काळजीची सुंदर अभिव्यक्ती होती.

त्याच काळात दादांनीही मोठ्या भावाची जबाबदारी मनापासून पेलली. तात्यांच्या कुटुंबाची संपूर्ण काळजी घेतली – कोणाला काय हवं-नको, कोणती अडचण असेल तर त्यावर उपाय, हे सगळं ते अत्यंत संवेदनशीलतेने करत.

दादांचा घरात आणि समाजात मोठा दरारा होता. त्यांच्या बोलण्यात मृदुता होती, पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक आदरयुक्त जरब होती, जी सर्वांनाच जाणवायची आणि भावायची !

आम्ही नगरला असतांना दादा अचानक गंभीर आजारी पडले—ब्रेन हॅमरेजमुळे. बराच काळ रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. डॉक्टरांनी खूप प्रयत्न केले, आम्ही सगळे त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी आशेने बघत होतो, पण प्रकृतीत फारशी सुधारणा होत नव्हती. शेवटी डॉक्टरांनी स्पष्टपणे सांगितलं, "आता त्यांना घरी नेणं उत्तम." मनाच्या कप्प्यांवर खोलवर घाव करणारा तो निर्णय आम्हाला घ्यावा लागला आणि मग आमच्या जीवाभावाच्या दादांना, काळजावर दगड ठेवून आम्ही घरी आणलं.

तात्यांना ही बातमी समजताच ते एका क्षणाचाही विलंब न करता संगमनेरहून नगरला आले. ते त्यांच्या कन्या प्रभाताईंकडे थांबले होते—ज्यांचे घर आमच्या घरापासून जवळपास तीन-चार किलोमीटर अंतरावर होतं. पण त्या वयात, पायाला थोडा आधार लागणाऱ्या तात्यांनी एकही दिवस विश्रांती घेतली नाही. दररोज सकाळी, काठी टेकत टेकत , संथ पण निश्चयी पावलांनी, ते दादांना भेटायला यायचे. त्या भेटी म्हणजे केवळ औपचारिकतेपुरत्या नव्हत्या. त्या भेटींमध्ये होता एक जीवात्म्यांचा संवाद—शब्दांशिवाय घडणारी नात्यांची उत्कट अभिव्यक्ती. त्याग, आपुलकी, निरपेक्ष प्रेम आणि बंधुत्वाची ही जिवंत मूर्ती होती. आजही तो काळ आठवतो, ते तात्यांचे शांतपणे दादांच्या शेजारी बसणं आठवतं... आणि नकळत डोळे पाणावतात. मन भरून येतं.

१९८२ साली मी बदलीमुळे मुंबईत होतो. त्या दरम्यान दादा आणि आई काही दिवस संगमनेरला भास्कर नाना यांच्याकडे होते. त्या काळात तात्या नियमितपणे नानांकडे येत असत. दादा आणि आई यांच्या तब्येतीची त्यांना

विशेष काळजी होती. त्यांच्या स्वास्थ्याकडे बारकाईने लक्ष ठेवणं, वेळोवेळी विचारपूस करणं हे तात्यांसाठी केवळ औपचारिक जबाबदारी नव्हती, तर जिव्हाळ्याच्या नात्यांतून उगम पावलेलं, अंतःकरणपूर्वक निभावलेलं एक स्वाभाविक कर्तव्य होतं.

आपुलकीच्या आधारावर उभं राहिलेलं बालपण

मामलेदार कचेरीच्या मैदानावर मी पहिल्यांदाच सायकल चालवायला शिकलो. शिकवायला कोणी नव्हतं; एका मैलाच्या दगडाचा आधार घेत, धडपडत, घसरत मी स्वतःच पेडल मारायचा प्रयत्न करत असे. पडताना गुडघे सोलले जाई, जखमांवर धूळ चिकटत असे, पण त्या दुखऱ्या जखमांमध्येही शिकण्याचा आनंद दडलेला होता. आजही त्या जखमांच्या खुणा बालपणाच्या हट्टाची गोड आठवण करून देतात.

तात्यांची मावस बहीण—खोपे आत्या—आमच्या कुटुंबासाठी आपुलकीची सावलीच होती. घरातल्या वडीलधाऱ्यासारखी तिची समजूतदार वागणूक, उबदार बोलणं, आणि सर्वांना एकत्र बांधून ठेवण्याची ताकद मनाला नेहमी दिलासा देणारी होती. माझी मोठी बहीण कुमुदिनी ताई, जी शिक्षिका होती, तिचं लग्न खोपे आत्यानी आपला सुपत्र दत्तोपंत यांच्याशी केले होतं. दत्तोपंत हे गावातले आदरणीय हायस्कूल शिक्षक असल्यामुळे घरात नेहमीच शिकण्याचा, आदराचा सुगंध दरवळायचा.

पण पुढे काळाने अनपेक्षित वळण घेतलं. कुमुदिनी ताईला मेंदू विकाराचा (Meningitis) गंभीर आजार झाला. ती बेशुद्धीत कधी बरळायची, कधी दत्ताचा आर्त धावा करायची. तिच्या या वेदनादायी अवस्थेकडे पाहताना आई, दादा आणि मी मनातून हादरलो. खोपे कुटुंबाने ताईला आमच्याकडेच

ठेवण्याचा निर्णय घेतला, कारण खरी काळजी आणि शुश्रूषा आम्हीच करू शकत होतो. तिला सरकारी दवाखान्यात दाखल केलं होतं. आई दिवसरात्र तिच्या जवळ बसून सेवा करत असे; दादा कमावते म्हणून बाहेरची धावपळ सांभाळत होते. त्या काळात घराची जबाबदारी आपोआप माझ्यावर येऊन पडली.

घरखर्चाला हातभार लावण्यासाठी मी अनेक छोटी-मोठी कामं करू लागलो—नाग-नरसोंबा विकणे, पतंग विक्री, किराणा दुकानात पुड्या बांधणे, मालपाणी यांच्या तंबाखूच्या कारखान्यात पाकिटं बनवणे, कटारिया मित्राच्या गुळाच्या दुकानात मदत करणे, अगदी अण्णांच्या पोस्ट ऑफिसात पॅकर म्हणून काम करणे. मिळेल तेवढे पैसे घरखर्चाला आधार देत, पण आई–दादांनी माझ्या अभ्यासावर कधीही विरजण बसू दिलं नाही.

ताईची शुश्रूषा, रुग्णालयातील धावपळ, जेवणाचा डबा नेणे—या सगळ्यामुळे माझा अभ्यास मागे पडू लागला. शाळा सोडावी लागेल की काय का अशी परिस्थिती निर्माण झाली होती. मनात काळजीची छाया होती, पण त्या कठीण काळात आवारी गुरुजी, आक्का आणि दाजी यांनी माझा हात धरून मला पुन्हा उभारी दिली. त्यांच्या आधारामुळे माझ्या मनात धीर जागा झाला. शेवटी ताई हळूहळू बरी झाली आणि आमच्या घरात पुन्हा हसरे दिवस परतले. तिच्या प्रकृतीतला प्रत्येक लहानसा सुधार आम्हाला नव्या आशेची झलक देत होता. त्या दिवसांच्या संघर्षाने मला जबाबदारीचं खरे महत्त्व शिकवलं, आणि त्या अनुभवाच्या बळावर मी कसाबसा हायस्कूलमध्ये प्रवेश घेऊ शकलो.

खोपें दाजीनी माझ्यासाठी आणखी एक अनमोल काम केलं. माझं शिक्षण अडू नये म्हणून ते स्वतःहून काही शिक्षकांकडे मला घेऊन गेले. “हा मुलगा हुशार आहे, कष्टाळू आहे; याचं नुकसान होऊ नये,” असं सांगून त्यांनी मला

शिकवणीसाठी ओळख करून दिली. मराळकर सरांनी इंग्रजी शिकवायला सुरुवात केली; पण त्यांनी कधीही फी मागितली नाही. घटे सरांनी गणित आणि विज्ञान शिकवलं, तरी त्यांनीही एक पैसाही घेतला नाही. त्यांच्या नि:स्वार्थ सेवेमुळे माझ्या शिक्षणाची गाडी थांबली नाही—उलट ती आणखी वेगाने धावू लागली. त्या काळातील त्यांचा त्याग आणि विश्वास आजही डोळ्यांत पाणी आणतो.

ती परिस्थिती किती तणावपूर्ण होती, हे शब्दांत सांगणं कठीण आहे. घरातील जबाबदाऱ्या, ताईच्या आजारपणाची काळजी, आर्थिक ताण, आणि अभ्यासाचा ओढा—सगळं एकत्र येऊन मनाला घेरून बसलं होतं. अशा वेळी तात्या नेहमीप्रमाणे आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. रुग्णालयातील एकही भेट त्यांनी चुकवली नाही. दररोज येऊन ते आईला आधार देत, दादाला धीर देत, माझ्या डोक्यावर हात फिरवत म्हणत, "धीर सोडू नकोस, सगळं ठीक होईल." त्यांच्या त्या एका स्पर्शात इतकी ऊब आणि खात्री दडलेली असे, की आमचं सगळं ओझं क्षणभर हलकं व्हायचं. त्या दिवसांनी मला जगण्याचे खरे धडे दिले. संघर्षाने परिश्रमाची किंमत शिकवली; अडचणींनी चिकाटीचं बळ दिलं. आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे—नात्यांच्या ओलाव्यातून मिळालेलं प्रेम, नि:स्वार्थ आधार आणि आपल्यावरचा विश्वास हाच माणसाला उभं ठेवतो, ही जाणीव खोलवर मनात कोरली गेली. आजही त्या आठवणी आठवल्या की, काळोखाच्या काळातही माणसामाणसांमधलं प्रेमच खरी ताकद ठरतं, याची जिवंत साक्ष मनात उजळून निघते.

देशप्रेमाच्या संस्कारांनी सजलेलं घर

आमचं घर हे फक्त संसाराचं एक निवासस्थान नव्हतं, तर ते देशभक्तीच्या विचारांनी उजळलेलं एक छोटंसं विद्यालयच होतं. घराच्या भिंतींवर, अंगणात,

दैनंदिन संवादांत—सगळीकडे स्वातंत्र्याची, त्यागाची आणि राष्ट्रनिष्ठेची एक अवीट छाप होती. त्या वातावरणात श्वास घेताना जणू देशप्रेमाचा सुगंध दरवळत असे.

दादा अभिमानाने सांगायचे की त्यांनी हातमागावर स्वतः विणलेला तिरंगा झेंडा आणि महात्मा गांधी व सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमा जिवंत करणारे विणलेले वस्त्र, एका जाहीर सभेत स्वतः गांधीजींनी स्वीकारले होते. त्या सभेत गांधीजींनी केलेलं त्या कलाकृतीचं कौतुक केवळ दादासाठी नव्हतं, तर संपूर्ण घरासाठी अभिमानाचं पर्व ठरलं. गांधीजींनी हातात घेतलेला तो तिरंगा झेंडा म्हणजे आमच्या घरासाठी जणू स्वातंत्र्याच्या पवित्र ज्योतीचं प्रतीक होता. त्या क्षणाने दादाच्या मनात देशभक्तीचा ठसा अधिक गडद झाला आणि घरातील प्रत्येक श्वास देशप्रेमाने ओथंबून गेला.

स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन हे आमच्या घरचे 'सणांचा सण' असत. त्या दिवशी पहाटेच घर जागं व्हायचं. अंगण धुऊन-पुसून, फुलांनी सजवलं जायचं आणि तिरंगा झेंड्याचं पूजन करून तो उंच फडकवला जायचा. झेंड्याच्या फडफडण्यातून जणू इतिहासाच्या झुंजींचा आवाज ऐकू यायचा. तो झेंडा डौलाने आकाशात फडकताना पाहून माझ्या बालमनातही देशासाठी काहीतरी करण्याची जाणीव उगवत असे. दादा त्या प्रसंगी थोर स्वातंत्र्यसैनिकांच्या भेटीगाठींचे, त्यांच्या त्यागमय जीवनाचे किस्से इतक्या जिवंतपणे सांगत की आम्ही जणू त्या काळात उभे आहोत, असं भासत असे. त्यांच्या तन्मयतेतून नकळत माझ्या मनात प्रेरणेची ज्योत पेटत असे.

तात्या देखील स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभागी होते. सरकारने त्यांना 'स्वातंत्र्यसैनिक' ही उपाधी बहाल केली होती. पण विशेष म्हणजे—देशासाठी मनात आगीसारखी धग असूनही त्यांनी कधीही कुटुंबाकडे दुर्लक्ष होऊ दिलं

नाही. देशसेवा आणि कुटुंबनिष्ठा यांचा आदर्श समतोल त्यांच्या प्रत्येक कृतीतून जाणवत असे. घरात अधूनमधून देशभक्त नेते, कार्यकर्ते येत-जात असत, आणि त्यांच्या उत्कट चर्चांमुळे घरातील वातावरण अधिक प्रेरणादायी, जाज्वल्य बनत असे.

माझ्या नावामागेही अशाच देशभक्तीची कथा दडलेली आहे. आईला नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याविषयी प्रचंड आदरभाव होता. म्हणूनच तिने माझं नाव 'सुभाष' ठेवलं. एकदा मी तिच्या मांडीवर डोकं ठेवून विचारलं, "आई, माझं नाव सुभाष का?" तेव्हा तिच्या डोळ्यांत पाणी तरारलं. ती हळूच माझ्या केसांवरून हात फिरवत म्हणाली, "आपल्या मुलाने नेताजींसारखं धैर्य, त्याग आणि देशप्रेम जोपासावं, म्हणून हे नाव दिलं." त्या एका वाक्यानं माझ्या अंतःकरणात जणू एक ज्योत पेटली . त्या क्षणी मला उमगलं—माझ्या नावातच आईच्या देशभक्तीचा ठसा आहे.

त्या दिवसांच्या आठवणी आजही माझ्या मनाला धीर आणि दिशा देतात. घरातील प्रत्येक कोपऱ्यात रुजलेल्या देशप्रेमाच्या त्या संस्कारांनी मला आयुष्यभरासाठी एक अदृश्य बळ दिलं—ज्यामुळे संकट कितीही मोठं असलं तरी देशासाठी, कुटुंबासाठी, मूल्यांसाठी उभं राहायचं धैर्य मनात सदैव जागं राहिलं.

एकाच मांडवात उमललेला अखंड बंधुभाव

दादा आणि तात्यांनी आपल्या मोठ्या दोन उपवर झालेल्या मुलींचा—कुमुदिनीताई आणि प्रभावतीताई—यांचा मंगलमय विवाह एकाच दिवशी, एकाच मांडवात, आणि लक्ष्मीनारायण मंदिराच्या विस्तीर्ण पटांगणात अत्यंत उत्साहात आणि समरसतेने पार पाडला. कुमुदिनीताईस खोपे घराण्यात आणि प्रभावतीताईस पाटणकर घराण्यात दिलं गेलं. हा निर्णय केवळ सोयीसाठी

घेतलेला नव्हता; तो होता त्यांच्या नात्याच्या खोलवर रुजलेल्या विश्वासाचा, अद्वैत प्रेमाचा आणि परस्पर स्नेहबंधाचा जिवंत पुरावा.

त्या दिवशी मंदिराच्या मागील मोठ्या पटांगणात एकच भव्य मांडव उभारला होता. पहाटेच्या मंद वाऱ्यासह सूर्यकिरणांनी उजळलेलं ते पटांगण जणू दोन कुटुंबांच्या आनंदाने भव्य रोशनाईने उजळून निघालं होतं. एका मांडवाखाली दोन विवाहसोहळे एकत्र पार पडत होते, पण वातावरणात मात्र एकच भाव होता—आनंदाचा, आपुलकीचा, आणि अभिमानाचा. एकच बँड, एकच नवरदेव मंडळी, एकच वऱ्हाडींचा गजबजलेला उत्साह…पण समाधान शतगुणित!

दादा आणि तात्यांच्या एकमेकांवरील अपार प्रेमामुळे या सोहळ्यात 'माझं-तुझं' असं काही नव्हतंच. नियोजनापासून खरेदीपर्यंत, आमंत्रणांपासून मेजवानीपर्यंत—सगळं काही खऱ्या अर्थाने 'आपलं' होतं. साऱ्या तयारीत एकमेकांना सामर्थ्य देणं, एकत्रित निर्णय घेणं, आणि एकत्र हसत-खेळत काम करणं…या प्रत्येक क्षणातून त्यांच्या नात्याची समरसता जिवंत होत होती. जणू दोन वेगवेगळ्या घरांना एकाच साखळीत बांधणारा तो सोहळा होता.

पंगतीच्या आठवणी आजही डोळ्यांपुढे तरळतात. पत्रावळीच्या पानावर वाढलेल्या वरण-भाताचा मंद सुगंध, डोक्यावर पापड फोडण्याच्या गमती-जमती, हळुवारपणे सुपारी सोडवण्याचे संकेत, वधू-वरांचे लाजरे स्मित…सर्व काही इतकं साधं पण तरीही किती मनोहर! वधू-वरांमधलं थोडंसं रूठणं-फुगणं, हसत-खेळत केलेली मनधरणी, वऱ्हाडींच्या गप्पांचा गजबजाट—हे सारे प्रसंग आठवले की चेहऱ्यावर आपोआप हसू फुलतं.

लहान मुलं म्हणून आम्हीही त्या सोहळ्यात धावपळ करत होतो. एखादं पान नेणं, फुलांची उधळण करणं, बँडवाल्यांच्या तालावर टाळ्या वाजवणं—प्रत्येक क्षण आमच्यासाठी नवा आणि रोमांचक होता. मोठ्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू चमकत होते, आणि आमच्या बालमनात मात्र या सोहळ्याच्या अप्रतिमतेची गोड छाप कायमची उमटली.

तो केवळ विवाहसोहळा नव्हता—तो होता दोन हृदयांचा, दोन घरांचा, आणि दोन भावांच्या प्रेमाचा, विश्वासाचा आणि एकोप्याचा अविस्मरणीय सोहळा. त्या दिवसाची प्रत्येक आठवण आजही मनाला ऊब देते, आणि एकच शिकवण देऊन जाते—**खऱ्या आनंदाची ताकद एकोप्यात, विश्वासात आणि प्रेमात असते.**

तात्या-काकूंचं मायेचं छत्र

मला वाटते ते १९५७ साल असावे. मला ४५ दिवसांचा विषमज्वर (टायफॉईड) झाला होता. माझ्या आईचा नी दादांचा जीव टांगणीला लागलेला होता. मी आजारी म्हणजे अगदी अंथरुणाला खिळून होतो. खूप अशक्त झालो होतो. आई दादा दिवस रात्र माझी डोळ्यात तेल घालून काळजी घेत होते. त्या काळात माझ्या आईने माझी दिवस रात्र केलेली शुश्रुषा आठवते. या डॉक्टराला दाखव त्या डॉक्टरला दाखव. मला आठवते डॉ. देशपांडे, माधव दाजींच्या ओळखीचे, यांची ट्रीटमेंट चालू होती. कोणी सांगितला तो खाजगी इलाज, उपास तापास, गंडे दोरे, अंगारे धुपारे कर असे इलाज भाबडेपणाने चालू होते. देवाकडे काही चुकले असेल देवा माफ कर असे सांगून त्यांच्याकडे आपल्या लाडक्या मुलाला लवकर बरे वाटावे यासाठी नवससायास करू लागली. दोघांची खूप घालमेल होत होती. आई तर घरात माझे संपूर्ण पथ्यपाणी सांभाळीत असे. घरात तळणे अजिबात बंद केले होते. सणवार अगदी

साधेपणाने साजरे होत. दादा त्यांना माहित असलेले आयुर्वेदिक इलाज करीत असत. ज्योतिष, आयुर्वेद संहिता या पुस्तकांचा आधार घेऊन इलाज करीत होते. आई रात्री-अपरात्री उठून डोक्यावर हात लाऊन ताप आहे का पाहत असे. मला तर तिच्या उबदार हाताचा स्पर्श अजूनही जाणवतो. ताप असला की मिठाच्या पाण्याच्या पट्ट्या ठेवत असे. दादांचे मित्र म्हणजे बाबुराव पाटणकर मामा मला नियमित भेटायला येत. माझी आपुलकीने चौकशी करीत. पाटणकर मामा मला अधून मधून फळ फळावळ असा खाऊ घेऊन येत. माझी चुलत बहिण प्रभाताई त्यांच्याकडे दिलेली होती. त्यामुळे सोयरे माणसे म्हणून ओळख होती. माझी खूप दारूण परिस्थिती झाली होती. आई दादांना खूप भीती वाटत होती. गल्लीतील मेहतर, केसेकर, दादांचे विणकाम मालक बंडूसा खत्री, गेटम, तात्या, विष्णू ठाणेकर, जुंद्रे काका, मावशी, गल्लीतील खत्रीन आई आणि सगळ्यात जास्त काळजी घेणारे माधव दाजी आणि आक्का मला नियमित भेटायला आई –दादांना धीर द्यायला आवर्जून यायचे. त्यांचा आई दादांना खूप आधार असायचा. मानसिक आणि आर्थिक ! ते दोघेही खूप जीव लावायचे. माझी आपुलकीने चौकशी करीत. माझ्या आईने तर मला वाटते नवस करताना एकाही देवाला सोडले नसावे. दादा आणि आई आलटून पालटून रात्रीचे डोळ्यात तेल घालून जागत होते. रात्री अपरात्री उठून ताप वाढला का कमी झाला हे पाहत. सर्व प्रकारचे इलाज करत. मला तेंव्हा बाबू असे हाक मारायचे आईचा आवडता देशभक्त सुभाषबाबू त्यातला मी बाबू. आजारपणामुळे मी खूप बारीक अशक्त झालो होतो. माझी आई म्हणायची माझा सुभाष मरता मरता वाचला.

या आजारातून बरे झालो नाही तोच मला हायाड्रोसील झाला. आई नागलीचे पान लाव, एरंडाचे पान लाव असे अनेक उपचार करून मी कसा लवकर बरा व्हावा यासाठी काळजी करीत होते. कोणीही काहीही सांगितलेले उपचार भाबडेपणाने करीत. मी म्हणजे एक प्रयोग शाळाच झालो होती. माझ्या

ह्या दुखाण्यांमध्ये खूप खर्च झाला. पैसे कमी पडू लागले तेंव्हा घरातील मोठी पितळेची भांडी विकावी लागली असे माई सांगते. या आजारांमुळे माझी एक किंवा दोन वर्ष शाळा बुडाली असावी. किंवा उशिरा शाळेत घातले असावे. आधीच बारीक आणि त्यात आजारपणामुळे आणखीन बारीक दिसू लागलो. या नंतर माझी तब्येत सुधारावी म्हणून सरकारी डॉक्टर काझी यांचे सांगण्यावरून टोन्सीलचे ओपरेशनही केले. आई दादांचे मी पांक्शीचे फळ होतो यामुळे ते जास्तच जीव लावत होते !! तसे सगळेच मला खूप जीव लावायचे..

माझ्या आजारपणाच्या काळात तात्या दररोज न चुकता भेटायला येत. त्यांच्या चेहऱ्यावरची काळजी, डोळ्यांतली मूक वेदना आणि हृदयातली जिव्हाळ्याची ओल अलगद जाणवत असे. माझी विचारपूस करून, अगदी आईच्या मायेने काहीतरी खाऊ घालायचे, आणि माझ्या चेहऱ्यावर थोडं हास्य उमटलं की, समाधान मानून निघायचे. त्यांचं ते मूक प्रेम, निःस्वार्थ आपुलकी आणि शाब्दिकतेपलीकडची माया- ती अनुभवलीच पाहिजे, सांगून समजणार नाही."

माझी आई आणि दादा दोघंही सकाळी कामावर निघून जात, आणि त्यांच्या अनुपस्थितीत *तात्यांच्या काकू म्हणजे माझं दुसरं घर, दुसरी आईच. त्यांच्या मायेच्या कुशीत माझ्या भुकेला, तहानेला आणि अगदी हाकेला सुद्धा प्रतिसाद मिळायचा.* त्या बालपणातील निखळ, निस्सीम आणि नात्यांनी भरलेल्या आठवणी आजही माझ्या जीवनाचा खजिना आहेत – *तात्या आणि काकूंच्या मायेची एक अमोल शिदोरी म्हणून.*

त्याकाळी आमच्याकडे आणि तात्यांकडे *शेळ्या, कोंबड्या* होत्या – त्या केवळ उपजीविकेचं साधन नव्हत्या, तर *कुटुंबाच्या आरोग्याचं आणि*

स्वावलंबनाचं प्रतीक होत्या. त्या देखभालीत सगळ्यांचाच वाटा होता – लहानांपासून मोठ्यांपर्यंत.

त्या काळात आमचं दोन्ही घरांचं आर्थिक चित्र खूपच साधं, पण प्रेमळ होतं.१९५६ *सालचा प्रलयंकारी पुर* आमच्या जीवनात संकटांचं मोठं सावट घेऊन आला होता. आमची घरे अक्षरशः पाण्याखाली गेली होती. पण त्या आपत्तीच्या काळात *नात्यांनी मात्र उंच कड्यावर उभं राहत* एकमेकांना सावरलं.

बाबूराव पाटणकर यांनी मोठ्या मनाने आम्हा सर्वांना त्यांच्या माडीत आश्रय दिला. त्या काळात आम्ही सर्वजण एकत्र राहत होतो—जणू घर नाही, पण माणसं होती, आणि त्यांचं मन मोकळं, भरलेलं मायेने.

आजही अधूनमधून स्वप्नात तात्यांचं आमच्या घरासमोरील ते जुनं घर उलगडत जातं — कच्च्या धाब्याचं, मातीचा ओटा असलेलं, आणि अंगणात वाऱ्यावर अलगद डोलणारा परिजातकाचा वेल. मुंजाबाबाच्या ओट्यावरचं ते लहानसं देऊळ, आणि त्याच्या पार्श्वभूमीला उभं असलेलं लिंबाचं नि पिंपळाचं झाड... हे सगळं फक्त स्मरणरंजन नाही, तर माझ्या अंतर्मनात खोलवर रुजलेल्या, अजूनही सरकन स्पर्शून जाणाऱ्या आठवणी आहेत.

त्या लिंबाच्या झाडाला नागपंचमीच्या दिवशी बांधलेला झोका आठवला, की अंगावर रोमांच उभा राहतो. आमच्या भगिनींचा उंच झोका घेण्यासाठी असलेला उत्साह, आणि त्या शर्यतीत उंचच उंच झोका घेण्याचा थरार अजूनही मनात धस्स करून जातो. (यात अक्का आणि ताई आघाडीवर त्यांची बरोबरी कोणीच करू शकणार नव्हते) त्या आठवणींना काळाचा थांग लागत नाही – त्या आजही ताज्या, प्रखर आणि भावभावनांनी ओतप्रोत भरलेल्या आहेत.

तात्या त्या वेळी खेडोपाडी *किर्लोस्कर इंजिन दुरुस्तीचं काम* करत, दिवसभर फिरून थकून घरी परतायचे. पण त्यांची घरातली एन्ट्री म्हणजे माझ्यासाठी खास सण ! कारण त्यांच्या सायकलवरून मला थोडं गल्लीत फिरायला मिळायचं.त्या दोन चाकांवरून मिळणारा आनंद माझ्या लहानशा विश्वासाठी फार मोठा होता. आजही डोळ्यासमोर तो क्षण जसाच्या तसा उभा राहतो—*तात्यांची थकलेली पण प्रेमळ नजर, आणि माझा ओथंबून वाहणारा उत्साह!*

मी देखील एसएससी करत असताना प्रेसमध्ये काम करू लागलो, आणि नंतर 'कमवा आणि शिका' या योजनेत सहभागी होऊन कॉलेजचे शिक्षण पूर्ण केले. आमचा हा सगळा कष्टमय, पण ठाम प्रवास पाहून दादा आई , तात्या-काकूंच्या डोळ्यांत समाधान दिसायचं, उर भरून यायचा.

मला स्टेट बँकेत नोकरी लागल्यावर, त्यांनी जिथे कुठे संधी मिळाली, तिथे माझं कौतुक केलं. जसं दादा आणि आई त्यांच्या पंखाच्या फळाकडे प्रेमाने पाहायचे, तसं तात्या-काकू अतिशय मेहनती सतीशच्या, थोरल्या बंधूंच्या पाठिंब्यावर उभारलेल्या यशाकडे आपल्या पंखीच्या फळासारखं प्रेमानं व अभिमानानं पाहायचे.

मी त्यांचा खास लाडका – *'बाबू'* असं प्रेमानं हाक मारणं, त्यांचं हसत हसत माझ्या डोक्यावरून हात फिरवणं – या गोष्टी अजूनही मनात रेंगाळतात. नोकरी लागल्यावर जरी मी 'सुभाष' या नावाने ओळखला जाऊ लागलो, तरी त्यांच्या डोळ्यात मी नेहमीच *'बाबू'च* होतो – लाडका, जिवाभावाचा !

नोकरीसाठी परगावी गेलो, आयुष्याच्या प्रवाहात दूर गेलो – तरी *तात्या आणि काकू यांचं प्रेम कधीच कमी झालं नाही.* ते नेहमी कुणाकडून तरी माझी चौकशी करत, आणि मी घरी आलो की माझं अगदी आतुरतेनं वाट बघत.

"बाबू जेवून घे, मगच जा**,"** असा त्यांच्या स्वरातला प्रेमाचा आग्रह अजूनही कानात घुमतो. त्यांच्या डोळ्यांतील काळजी, प्रेमाची साद आणि मनातील ओढ मला प्रत्येक भेटीत जाणवायची.

त्यांच्या वृद्धापकाळात किंवा आजारपणात मी त्यांच्या जवळ नसल्याची खंत मनात उरलीच आहे… पण मी जिथे जिथे होतो, तिथून मी त्यांच्यासाठी चिंतेने आणि प्रेमाने बांधलेलो होतोच.

सख्खा की चुलत, असा भेद कधीच आमच्या मनाला शिवला नाही. आम्ही तर *एकाच झाडाच्या फांद्या होतो – थोड्याफार वळणाच्या, पण एकाच मुळाशी घट्ट बांधलेल्या.*

अलका ताईने माझं हे माझे चालू असलेले लेखन वाचून एक आठवण सांगितली – 'आम्ही सगळी भावंडं बाबांच्या (तात्यांच्या) घरी जाऊन त्यांच्या मुलांसोबत, नातवंडांसह – विशेषतः विद्याबरोबर – खूप मस्ती करायचो, धिंगाणा घालायचो. पण आजी म्हणजेच काकू – कधीच रागावल्या नाहीत. उलट, त्यांनी आम्हा सर्वांना भरभरून लाड करून आपुलकीने स्वीकारलं.'

मंगलच्या लग्नाची पत्रिका द्यायला तात्यांनी स्वतः अलका ताईच्या घरी जाऊन, आदरपूर्वक आणि आग्रहाने त्यांना आमंत्रण दिलं होतं. हे सगळं ऐकताना तात्या-काकूंच्या प्रेमळ, उदार, आणि माणुसकीने ओतप्रोत व्यक्तिमत्त्वाचा पुन्हा एक हृदयस्पर्शी पदर उलगडतो

संकटात उजळलेलं बंधुत्व

एक प्रसंग आजही काळजावर कोरला गेलेला आहे — तो आठवताना डोळ्यांसमोर जसा स्पष्ट उभा राहतो, तसाच मनात एक अस्वस्थ हलकल्लोळ निर्माण करतो. समाजातील प्रतिगामी विचारसरणी, चुकीच्या धारणा, रूढी आणि परंपरांच्या भोवऱ्यात आमच्या दोन्ही कुटुंबांवर कठोर आणि अमानुष अशी सामाजिक शिक्षा लादण्यात आली. एका चुकीच्या समजुतीच्या आधारे, आम्हाला वाळीत टाकण्याचा निर्णय झाला.

त्या बहिष्काराची धग इतकी तीव्र होती, की प्रत्येक दिवस अपमान, उपेक्षा आणि मानसिक वेदनेच्या सावटात जात होता. समाजाने त्या तथाकथित 'शिक्षे'अंतर्गत संपूर्ण समाजाला एक भलीमोठी जेवणाची पंगत देण्याची मागणी केली, जी त्या काळात दादा आणि तात्या, दोघांनाही एकत्रितपणेही आर्थिकदृष्ट्या पेलवणारी नव्हती. हे संकट केवळ सामाजिक दबावापुरते मर्यादित नव्हते, तर ते आमच्या आत्मसन्मानावर आणि अस्तित्वावर घाव घालणारे होते.

परंतु दादा आणि तात्या हे शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारसरणीचे कट्टर अनुयायी होते. अन्याय, अंधश्रद्धा आणि सामाजिक दुजाभावाच्या विरोधात उभं राहणं हे त्यांचं जीवनव्रतच होतं. त्या कठीण क्षणी — एक क्षणभरही न डगमगता, विचलित न

होता — ते खांद्याला खांदा लावून ठामपणे उभे राहिले.संयम, धैर्य आणि जबाबदारीने त्यांनी परिस्थितीचा सामना केला. कोणतीही तक्रार न करता, कुठलाही राग अथवा प्रतिकार न दाखवता, त्यांनी समजुतीच्या मार्गाने प्रसंग हाताळला. त्यांच्यातील परस्पर समजूत, विश्वास आणि अटळ पाठिंबा – तो शब्दांपेक्षा अधिक प्रभावी संवाद होता. डोळ्यांतूनच दिलासा आणि निर्धार व्यक्त होत होता.

या अत्यवस्थ प्रसंगातही त्यांनी सलोख्याचा मार्ग निवडला आणि स्वतःच्या मूल्यांना तडा जाऊ न देता, संपूर्ण कुटुंबाचं सन्मानाने नेतृत्व केलं.

हा प्रसंग म्हणजे त्यांच्या नात्यातील निस्सीम भावबंधाची, अटळ विश्वासाच्या भक्कम पायावर उभ्या असलेल्या बंधुतेची, आणि संकटसमयीही न तुटणाऱ्या सहकार्याची जिवंत साक्ष ठरली.

अशा प्रसंगांनी वेळोवेळी हे अधोरेखित केलं की दादा आणि तात्या केवळ सहकारी नव्हते — ते एकमेकांचे आधारस्तंभ होते. एकाच्या आयुष्यात वादळ आलं, तर दुसरा शांत, खंबीर दीपस्तंभासारखा त्याच्या शेजारी उभा राहत असे. त्यांच्या नात्यात संकोच नव्हता, मत्सर नव्हता, शंका तर नव्हतीच; होती ती फक्त निस्सीम निष्ठा, अविचल साथ आणि अंतःकरणातून उमटणारं अबाधित प्रेम.

त्यांच्या जीवनातील हे प्रसंग आजही आमच्यासाठी धैर्य, ऐक्य आणि मनाची उंची यांचे अमूल्य धडे देणारे ठरतात — अशा अनुभवांमधून आम्ही केवळ नात्याचं नव्हे, तर माणुसकीचं खरे रूप पाहिलं.

आमची धाकटी बहीण लता हिचं लग्न ठरलं आणि दुसरीकडे माझं शिक्षण सुरूच होतं. या दोन मोठ्या आणि तितक्याच जड जबाबदाऱ्यांचं ओझं

उचलण्यासाठी दादांनी मोठं धाडस केलं — जणू काळजाचा तुकडाच त्यांनी कापून दिला. घराचा पुढील भाग विकून आम्ही उरलेल्या उत्तरेकडील एका भिंतीच्या आडोशाला आलो. पण ते कसले घर? चार भिंतींचं माणुसकीचं उबदार कवच जणू हरवलंच होतं.

पूर्वेला भागवत दादांचा गुरांचा गोठा — पहाटेपासून ते रात्रिंपर्यंत गुरांच्या आवाजांनी कान भरून जायचे; पश्चिमेला लावलेल्या बाडदानच्या पलीकडे भिंतीचं नावगावच नव्हतं — तिथे मोकाट, घाणेरडी डुकरांची गर्दी सुखेनैव नांदत असायची; दक्षिणेकडील भाग मोडकळीस आलेला आणि एकटीच उत्तरेकडील नवीन मालकाने बांधलेली भिंत — एवढाच काय तो आमचा आधार ! त्या मोडकळीस आलेल्या, जखमी घराच्या कुशीत आम्ही नव्यानं जगण्याची सुरुवात करत होतो.

हे दुर्दैवी चित्र तात्यांच्या डोळ्यांत वारंवार ठसठसत राहायचं. त्यांचं आणि आमचं घर यांच्यातील अंतर बरेच वाढले असलं तरी — त्या अंतराने ,मधल्या भिंतीने जणू दोन जिवांच्या कणखर प्रेमाला दुराव्याची खोल पोकळी देऊन टाकली होती. पूर्वी जिथे दिवसातून कितीतरी वेळा एकमेकांची चाहूल लागत असे, एकमेकांच्या घराकडे नजर जात असे, सहज डोकावले जात असे — तिथे आता मूक ओलसर शांतता दाटलेली होती. त्या सर्व सवयींना, त्या ओढीला, त्या सहज जिव्हाळ्याला आम्ही मुकलो होतो. मनामनांत एक सल, एक न मिटणारी चुटपुट सतत धगधगत होती.

तरीही ते दोघं — तात्या आणि दादा — या भिंतींच्या, रस्त्यांच्या पलीकडून एकमेकांपर्यंत पोहोचायचा रस्ता शोधतच राहिले. नजरानजर होणं कठीण झालं तरी मनामनांची ओढ मात्र अधिक तीव्र होत गेली. वेळ काढून भेटणं, एका शांत शब्दातून एकमेकांना दिलासा देणं — हे त्यांचं अविरत सुरू

होतं. त्या दोघांच्या डोळ्यांत एकमेकांच्या व्यथांचं प्रतिबिंब उमटलेलं असे... पण मी मात्र... माझ्या त्या जिवलग, सावरणाऱ्या, हळव्या तात्या, सवंगडी बंधूंच्या गाठीभेटींस मुकलो होतो. मन अस्वस्थ व्हायचं, हळवं व्हायचं...

त्या कठीण काळात तात्यांनी दादांच्या पाठी खंबीरपणे उभं राहत त्यांच्या मनाला आधार दिला. त्यांचं ते निस्सीम प्रेम, जिव्हाळा, बंधुत्वाचं अपार भांडार — दादांना या वादळातून वर काढत होतं. म्हणूनच दादा कधीच डगमगले नाहीत. म्हणूनच ते घर, ती एकमेव उरलेली भिंत आणि आम्ही सारे — पुन्हा एकदा उभं राहू शकलो... त्या न दिसणाऱ्या बंधाच्या अदृश्य धाग्यांवरच आमचं ते उध्वस्त पण आशावादी जगणं पुन्हा फुलू लागलं.

आज तो प्रसंग आठवतो, तेव्हा मनात बंधुत्वाच्या नात्याची जाणीव अधिक गहिरतेने दाटून येते. त्या एका निर्णयाने केवळ आमचं कुटुंब सावरलं नाही, तर एकमेकांच्या सुख-दुःखात साथ देण्याच्या नात्याला खरा अर्थ मिळाला.

वारसाहक्काची शिदोरी

दादा यांचे तेज आणि तात्यांची मृदूता – कुटुंबासाठी एक प्रेरणादायी संगम

दादा यांचे तेजस्वी व्यक्तिमत्त्व आणि तात्यांची कोमल, मृदू वृत्ती – या दोन गुणांचा संगम संपूर्ण कुटुंब, नातेवाईक आणि सहकाऱ्यांना नेहमीच भारावून टाकत असे. त्यांच्या सहवासात प्रत्येकाला आपुलकीची ऊब, सन्मानाची जाणीव आणि निश्चिंत आधार मिळत असे. सुसंस्कृत, स्पष्ट आणि समजूतदार संवाद ही दोघांची समान खूण होती. कोणत्याही विषयावर त्यांनी मांडलेले विचार सहज विश्वास निर्माण करीत आणि आदराची भावना जागवीत.

समाजाभिमुख वृत्तीमुळे त्यांचे पाऊल नेहमी समाजोपयोगी कामांकडेच वळत असे. दोघांमध्ये परस्पर अपार आदर होता; त्यांनी कधीही एकमेकांविषयी तक्रार केली नाही. उलट, संधी मिळेल तेव्हा सार्वजनिकरित्या एकमेकांचे गुणगान करून परस्परांचा सन्मान उंचावला. त्यांचा परस्पर विश्वास, आदर आणि सहकार्य हे सर्वांसाठी प्रेरणादायी आदर्श ठरले.

दादा आणि तात्या यांचे नाते हे परिपक्वता, निस्सीम प्रेम आणि उदार समजूत यांवर उभे होते. त्यांच्या नात्यामध्ये अहंकाराला कधीही स्थान नव्हते; फक्त परस्परांवरील श्रद्धा, संयम आणि मोठेपणाला मान देणारी उदार वृत्ती होती. वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवून कुटुंबाच्या हितासाठी निर्णय घेण्याची त्यांची तयारी हे त्यांच्या जीवनाचे वैशिष्ट्य होते.

कुटुंब व्यवस्थेत त्यांचे योगदान अमूल्य आहे. त्यांनी जपलेले विश्वास आणि संस्कारांमुळे आमच्या घराला केवळ आर्थिकच नव्हे, तर चारित्र्यसंपन्नतेचा आणि मूल्यांचा ठेवा लाभला. त्यांच्या जीवनमूल्यांनी पुढील पिढ्यांसाठी भक्कम पाया घातला. दादा हे समजूतदार, वस्तुनिष्ठ आणि योग्य सल्ला देणारे होते. कुटुंबातील किंवा शेजाऱ्यांतील कुणी अडचणीत असला तर ते शांतपणे संवाद साधून मार्गदर्शन करीत. परंपरेचा सन्मान राखत त्यांनी आधुनिकतेचाही स्वीकार केला होता; त्यामुळे परंपरा आणि प्रगती यांचा सुंदर समतोल त्यांनी साधला. शिक्षण, नोकरी, व्यवहार, समाजस्नेह आणि कुटुंबवत्सल्य या सर्व क्षेत्रांचा उत्तम संगम त्यांच्या जीवनात दिसत असे.

दादा हे शिक्षणात प्रावीण्य मिळवणारे, बुद्धिमान आणि चिकाटीचे प्रमाण होते. ज्योतिष, आयुर्वेद आणि धार्मिक विधी यांमध्ये त्यांना सखोल ज्ञान होते. त्यामुळे घरातील विधींमध्ये (उदा. विवाहातील मंगलाष्टके, सत्यनारायण पूजा) पुरोहिताची वाट न पाहता तेच सहजतेने सर्व विधी पार पाडत.

हातमागाच्या व्यवसायातही त्यांनी कर्तृत्वाची उंच शिखरे गाठली. कामातील निष्ठा, शिस्त आणि प्रामाणिकपणामुळे सहकारी, मालक आणि नातेवाईक यांच्यात त्यांना विशेष आदर मिळाला. तेजस्वी व्यक्तिमत्त्व, स्पष्टवक्ता स्वभाव आणि सामाजिक जाण यामुळे दादांनी सर्वांच्या मनात अविस्मरणीय स्थान मिळवले. दादा-तात्यांनी जपलेले नि:स्वार्थ प्रेम, माणुसकी आणि कुटुंबासाठी केलेला त्याग आमच्यासाठी अनमोल वारसा आहे. त्यांच्या हातून रुजलेले संस्कार आज वटवृक्षासारखे फुलले आहेत. आम्ही त्यांच्या शिकवणीचा केवळ स्मरणरंजनासाठी नाही, तर आचरणासाठीही जप करतो. हाच आमचा खरा वारसा आहे.

दादा-तात्यांच्या सुवासिक आठवणी आमच्या कुटुंबाचा आत्मा आहेत. त्या आठवणींमधून आम्हाला प्रेम, त्याग, संयम आणि कुटुंबनिष्ठा शिकायला मिळाली आहे. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत आम्हीही एकमेकांचे आधार होऊ, माणुसकी जपू आणि कुटुंबसंस्थेचे हे अमूल्य रत्न पुढील पिढीकडे पोहोचवू – हीच त्यांना साजेशी खरी आणि अर्थपूर्ण श्रद्धांजली ठरेल !!

पुढची पिढी



डावीकडून मधू भाऊ , भास्कर नाना , दिनकर आण्णा आणि सुभाष

डावीकडून सोमनाथ, रमेश, सुरेश भाऊ, सतीश (मांडीवर)

माझे दादा

शिस्त, समर्पण आणि प्रेमाने भरलेली आयुष्य कथा
"शिस्त, माया आणि बालपणीचं सोनेरी विश्व"



माझ्या लहानपणीच्या काही आठवणी आजही माझ्या मनात गोड ठराविक ठिकाणी जणू अडकून राहिल्या आहेत. एक अत्यंत खास गोष्ट जशीची तशी मला आठवते, ती म्हणजे माझे दादा रंगारगल्लीतील तालमीत नियमितपणे जात. तेथे जोर बैठका, दंड काढणे आणि इतर शारीरिक कसरती करायचे, ज्यामुळे त्यांची शारीरिक ताकद आणि तंदुरुस्ती वाढत होती. मी लहान असतानाही दादा मला सोबत घेऊन जात, आणि मला तिथे असलेल्या व्यायामशाळेची सफर घडवून देत. उघडेबंब पैलवानांचे प्रचंड शरीर आणि त्यांची ताकद पाहून मला नेहमी प्रेरणा मिळत असे. एक दिवस दादा म्हणाले, "बाबू तु पहातोस ना ? हे सर्व लोक शारीरिक कष्ट घेत आहेत, त्यामुळे त्यांचे शरीर सशक्त आणि तंदुरुस्त आहे. तुही हेच करायला हवं." ते म्हणत, मी त्यांच्या

सोबतीने त्या कसरतींमध्ये भाग घेत होतो, आणि त्यांच्याकडून खूप शिकत होतो.

दादांच्या एक खास गोष्टीची आठवण आहे, जी आजही मला स्पष्टपणे आठवते – ते मला प्रवरा नदीवर पोहायला शिकवायचे. एकदा ते म्हणाले, "आज नदीत पोहायला शिकवतो, तुझं भय दूर करायला मदत होईल." पण मला पोहायला शिकताना खूप भीती वाटत होती. नदीच्या खोल पाण्यात जाणं आणि सूर मारणे, मला ते खूप कठीण वाटायचं. ते शांतपणे म्हणाले, "तु करू शकतो , मी तुमच्यासोबत आहे." त्यांचा आवाज ऐकून मला धीर आला, आणि त्यांच्यासोबत मी पोहोत होतो.

दादा त्यांच्या दैनंदिन दिनचर्येतील एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते सकाळी प्रातःर्विधी करून परत आल्यावर, आपल्या डोळ्यांची काळजी घेत असत. "हे मध डोळ्यात घालल्याने डोळ्यांना ताजेतवाने वाटतं," असे ते म्हणायचे. दररोज ते डोळ्यात तरवडाच्या झाडाचा चिक घालायचे, आणि नियमितपणे मध देखील डोळ्यात घालायचे. कदाचित याच कारणामुळे त्यांना शेवटपर्यंत चष्मा लागला नाही. ते कधीही त्यांच्या डोळ्यांच्या स्थितीबद्दल काहीही सांगत नसले तरी, त्यांची काळजी आणि दिनचर्या यावरून ते आपली शारीरिक तंदुरुस्ती राखण्यासाठी किती सजग होते, हे लक्षात येत होते. शिवाय, ते शिवाम्बू पिऊन देखील शरीर ताजेतवाने ठेवायचे. "शिवाम्बू पिऊन शरीर निरोगी राहतं," असे ते नेहमी म्हणायचे. त्यांच्या या सवयींमुळे त्यांचे शरीर कायम निरोगी आणि ताजेतवाने राहायचे.

आणखी एक गोष्ट सांगायची आहे – माझ्या आईला दोन्ही कानांनी खूप कमी ऐकू यायचं. तिचा आवाज खूप मोठा आणि खणखणीत होता. ती काहीही बोलताना मोठ्या आवाजात बोलायची. मला वाटतं की, तिला खूप

दिवसांपासून कमी ऐकू येत होतं, पण ती कधीही ते सांगायची नाही. मी दूरूनच तिचा आवाज ओळखू शकत होतो, कारण तिचा आवाज खरंच वेगळा होता. तिची आवाजाची एक वेगळी ओळख होती.

याच्या अगदी उलट, दादा खूप सौम्य आणि शांतपणे बोलायचे. त्यांचा प्रत्येक गोष्टीत वेळेचा आदर आणि एक प्रकारचा संयम होता. "आपण वेळेवर सर्व गोष्टी करायला हवं, तेच आपल्याला यश देईल," असे ते नेहमी सांगत. त्यांनी दिलेला प्रत्येक शब्द, प्रत्येक क्रिया म्हणजे शिस्त आणि ध्येयाच्या प्रति पूर्णपणे समर्पण असे . रोज सकाळी लवकर उठून, ते फिरायला जात, आणि घरीही जोर बैठका, सूर्य नमस्कार करणे यावर त्यांचा नियमित असा नित्यक्रम होता. त्यांची जीवनशैली एक उत्तम उदाहरण होती, जिथे संयम, शिस्त आणि तपश्चर्येचा आदर केला जातो.

दादा सकाळी आठ वाजता चहानाश्ता करून देवी गल्लीतील बंडूसा खत्री यांच्या घरातील मागावर विणकामासाठी जात. नाष्ट्यात सातूचे पीठ गुळाच्या पाण्यात कालवून ते खात, आणि ते नेहमी मला ते दिले जायचं. "हे सातूचं पीठ खाल्ल्यामुळे शरीराला बळ मिळतं," असे ते सांगत, मी ते खायला आवडीने घेत होतो. दुपारी बारा वाजता, उन्हाळ्यातही किंवा पावसात, ते घरी परत येत जेवायला. वामकुक्षी घेऊन दोन वाजता परत जात, आणि संध्याकाळी सात वाजता परत येत.

घरासमोर एक मोठं अंगण होतं, जिथे संध्याकाळी चंद्राच्या प्रकाशात, आम्ही सर्व एकत्र जेवायला बसायचो. जर मी खेळण्याच्या नादात थोडा उशीर केला, तर आई रागवायची आणि आम्ही सगळे एकत्र जेवायला बसत होतो. त्यात काही विलंब झाला, की ती तिच्या आवाजात आपला राग व्यक्त करत असे. "जेवायला उशीर झाला तर कसं चालेल?" ती मोठ्या आवाजात

म्हणायची. गल्लीत खेळायला गेलो, तर आई मला हाक मारून बोलावायची, "बाबू आता चल, जेवायला वेळ झालाय!"

आमच्या घराच्या समोर तात्यांचं (माझे चुलते) घर होतं. तात्या खेडोपाड्यांमध्ये इंजिन दुरुस्तीसाठी सायकलवर जात असत. सायंकाळी परत आल्यावर, नगर पालिकेचा भोंगा ऐकल्यावर, दादा चौकशी करायचे, "गाडी उशिराने का आली?" रस्त्यावरून जात असताना, ते प्रत्येकाला "राम राम" करायचे, आणि पान सुपारी खायला बोलावायचे. "पान घ्या, त्यात औषधी गुण आहेत," असे ते सांगत.

दादांचा पितळी कडी असलेला पानाचा चौकोनी डबा, त्यातील वजनदार पितळी अडकित्ता आणि आईची चंची अजूनही माझ्या मनात जिवंत आहेत. त्या वेळेच्या सर्व आठवणी, एकत्र कुटुंबाची भावना, आजही माझ्या मनामध्ये चांगुलपणाची जागा घेऊन आहेत.

कष्ट आणि करारीपणाचा महामंत्र

माझ्या आई आणि दादांना तात्यांचे घरचे लहान मोठे सगळेच "मोठी आई" आणि "मोठे दादा" म्हणायचे. सर्व लहान मोठ्या गोष्टीत त्यांचा सल्ला घेतला जायचा तो त्यांना मोलाचा असायचा. तात्या आणि दादा आपापल्या सवंडीप्रमाणे खूप गप्पा मारायचे ते काय बोलायचे ते माझ्या आकलणाबाहेर होते.

मी कधी कधी त्यांच्याकडे कामाच्या ठिकाणी जात असे. काही कारणाने जावे लागे. दादा खूप मित भाषी होते. आपले काम भले आणि आपण भले असे त्यांचे होते. अध्यात्मिक स्वभावाचे होते. सकाळी आंघोळ झाली की कपडे बदलताना वेगवेगळी स्तोत्र म्हणायचे. तीच सवय मला लागली आहे.

त्यांची बरीच स्तोत्र तोंड पाठ होती. ती ऐकून ऐकून माझीही पाठ झाली होती. त्यातील काही आताही मी म्हणतो. दादा घरातील देव्हाऱ्यातील देवतांची पुजा मनोभावे करीत. पूजेचा त्यांचा एक विशिष्ट अनुक्रम असायचा. त्यात बदल नसायचा. पुजा झाल्यावर गणपती अथर्वशीर्ष ,व्यंकटेश स्तोत्र , शनि महात्म्य, भगवत गीता वाचत. या सर्व पोथ्या गीता त्यांच्या तोंड पाठ असत. सत्यनारायण पुजा , नवनाथ पोथी पारायण, आदि ते घरीच करायचे. मी ऐकले जेंव्हा पूजेला भटजी मिळत नसे तेंव्हा ते त्या पुजा स्वतः करायचे. त्यांचे शब्दोच्चार शुद्ध आणि स्पष्ट होते.

माझे दादा एकदम Gentleman !! त्यांच्या शब्दाला समाजात आणि नातेवाईक यात मान होता. नातेवाईक त्यांचा सल्ला घेत असत. त्यांचे वीणकाम बघून आपणही तसे धोटे मारावे असे वाटे. मजा वाटत होती. दादा विणत असताना कधीच बोलत नसत. कामाची तंद्री ढळू देत नसत. विणकामच्या धोंटयाकडे बारकाईने लक्ष असे. पायाची आणि हाताची हालचाल लयबद्ध होती. आम्हाला घरी कधी कधी पैसे लागले तर जवळ जेवढे असेल तेवढे काढून देत. अथवा मालकांकडून उचल (advance) घेऊन माझी पूर्तता करीत. (ते पैसे कंबरेला धोतरात कासोट्याला बांधून ठेवलेले असायचे). प्रत्येक खर्चाच्या वेळी शिल्लक आवर्जून मोजायचे पुढील नियोजनासाठी. त्यांचे पैसे घरातील एका दाराजवळील घरी कुलूप लावलेल्या कपाटातील एका काळ्या लाकडी पेटीत असे. कपाटाला आणि पेटीला कुलूप असे. ते पै आणि पैचा हिशोब लिहून ठेवत.

मला समजू लागल्यावर माझ्या मनात एकदा विचार आले. साडीला किती धागे असतात? असंख्य !! समजा ते लाखभर असतील तर? माझे दादा तेवढ्या वेळा आपले पाय खालीवर करत, धोटे मारावयास तितक्यावेळा आपला एक हात मागे पुढे करीत आणि एका हाताने धोटे इकडून तिकडे दोन

धाग्यात (फेकत) ढकलत असत. म्हणजे माझे दादा प्रत्येक कृती कमीत कमी लाखभर करीत होते एक साडी तयार करण्यासाठी ! किती कष्ट करावे लागत होते त्यांना!! हे आठवले कि मन अगदी हेलावून जाते आणि त्यांनी आमच्या साठी किती कष्ट केले याची जाण होऊन नतमस्तक होतो आणि डोळ्यात नकळत अश्रू उभे राहतात. खरंच हाडाची काड करणे यालाच म्हणतात. एक दोनदा तब्येत बरी नसतानाही काम करीत असताना, दादा जागीच मागाच्या खड्ड्यात चक्कर येऊन पडले होते. सर्वाची खूप धाव पळ झाली होती. दादा जेवण झाल्यावर तांबुल भक्षण करीत. तंबाखू अगदी मर्यादेत. ती ही फक्त तल्लफ जाण्यासाठी. अहो, विणताना त्यांना वेळ कोठून असायचा? त्या कामाच्या तंद्रीतून बाहेर येऊन आपली तल्लफ पूर्ण करायला. नंतर तीही बंद झाली. तल्लीन होवून विणकाम करणे हीच त्यांची ध्यान धारणा होती.तपस्या होती.

दादांच्या पाठीत कधी कधी उसन भरायची. पाठ खूप दुखायची . माझ्याकडून कामावरून आल्यावर पाठीवर उभे राहून पाठ दाबून घ्यायचे. कधी सकाळी उठून प्रातर्विधीला जाताना आणि येताना विजेच्या खांबाला आपली दुखणारी पाठ- कंबर रगडायचे. औषधाला पैसे खर्च होतील म्हणू तसेच अंगावर काढायचे. त्यांचा पेहराव म्हणजे मांजर पाटाची स्वच्छ पांढरी बंडी, धोतर, पांढरा फुल शर्ट, पंढरी स्वच्छ टोपी, गळ्यात जानवे, पायात चपला !!

त्यांचे हस्ताक्षर खूप सुंदर तसेच सुरेख होते. एक पूर्ण ओळ आखून त्याच्या सहाय्याने लिखाण करीत. खाडाखोड नसे. (दिनकर) आण्णांचे लग्न जमले, तेंव्हा मला त्यांचा पत्रव्यवहार पाहायला मिळाला.ते पत्राची रा.रा. श्रीयुत.... अशी करत असत आणि शेवट "घरातील सर्वाना वयोमानाप्रमाणे नमस्कार दंडवत आशीर्वाद कळावे लोभ असावा आपला विष्णू मार्तंड धारणकर" अशा प्रकारेच असायचे. त्यावेळी दौत आणि टाक हे लिखाणासाठी

असायचे. जवळ टीप कागद किंवा बारीक माती असे, न वाळलेली शाई टिपण्यासाठी. आमच्याकाळी बोरुनेही आम्हाला अक्षर गिरवावे लागे.

दादा खूप स्वाभिमानी होते. देशाबद्दल त्यांना खूप कळकळ होती. पक्के कॉंग्रेसवादी होते. घरी तिरंगा झेंडाही होता. २६ जानेवारी, १५ ऑगस्ट रोजी आमच्या घरावर फडफडत असे. मला खूप अप्रूप वाटायचे. घरात वस्त्रावर विणलेल्या चार तसबिरी होत्या. माझे आजी आजोबा, सुभाष बाबू आणि महात्मा गांधी. एका प्रदर्शनात या चित्रांचे खूप कौतुक झाल्याचे दादांनी सांगितल्याचे आठवते. संघाच्या लोकांचा त्यांना राग होता. यांच्या कुट नितीबद्दल ते सांगत. नेहरू आणि इंदिरा गेल्या तेंव्हा दादांना अश्रू अनावर झाले होते. इंदिरा गांधींची हत्या झाली , त्यावेळी आम्ही नगरला होतो. तेंव्हा ते दिवसभर टिव्ही समोर बसून होते. संगमनेरला माझ्या लहानपणी इंदिरा गांधी पाण्याच्या टाकिच्या उद्घाटनाला आल्या असताना त्यांना पाहण्यासाठी ते मला त्यांचे बोट धरून घेऊन गेले होते. तर १९६०मध्ये नगरला असताना पंडित नेहरूंच्या सभेलाही लाल टाकी वरचे भाषण ऐकायला आणि त्यांना पाहायला दादा मला घेऊन गेले होते. मी आणि दादांनी चाचा नेहरुना केलेला हात आणि त्यास नेहरूंनी दिलेला प्रतिसाद आजही आठवतो.

अशाच प्रकारची आणखी एक व्यक्ती माझ्या लक्षात राहिली ती म्हणजे मा. नवनीतभाई बार्शीकर नगराध्यक्ष अहमदनगर नगर पालिका. त्यांच्या काळात नगरचा जो कायापालट झाला तो त्या नंतर कोणाच्याच काळात दिसला नाही. त्यांच्याच काळात नगरला मुळेचे पाणी पाईप लाईनने आले. नगरची MIDC अस्तित्वात आली. नेहरू मार्केट, सिद्धीबाग, गांधी बाग ,नगरच्या रस्त्यांचे डांबरीकरण झाले. ते स्वतः प्रत्येक गल्लीत जाऊन जातीने सर्व व्यवस्था बघत

असत. गल्लो गल्ली जातीने जावून साफ सफाई करून घेत पण त्यांनी त्याबद्दल कोठेही गवगवा केला नाही.

दादा – जीवनाचे खरे मार्गदर्शक

संगमनेरच्या आमच्या घरी एक मोठे लोलक असलेले घड्याळ होते. ते बिघडले की दादा स्वतःच त्याची दुरुस्ती करत. ज्यावेळी त्यातील अतिळ बाह काढून रॉकेल मध्ये त्यातील गंज जाण्यासाठी भिजत घालत त्या वेळी मला त्यातील यंत्रणा पाहायला मिळे, आणि त्यांनी घड्याळाच्या कार्यप्रणालीची माहितीही दिली होती. त्या घड्याळाचे वैशिष्ट्य म्हणजे दर अर्ध्या तासाला एक आणि प्रत्येक तासाला त्यावेळच्या संख्येनुसार टोल वाजत असत.

दादा स्वाभिमानी आणि करारी होते. त्यांच्या स्वाभिमानानेच त्यांनी मिळालेली विणकाम शिक्षकाची नोकरी 'गुलामी नको' या विचाराने सोडून दिली. मात्र, त्याच वेळी ती नोकरी स्वीकारली असती तर आज हातमागाचे लाकडे ओढत बसावे लागले नसते, अशी खंतही व्यक्त करत. त्यांना खोकल्याचा त्रास झाला असताना संगमनेरच्या डॉक्टरांनी हवामान बदलण्याचा सल्ला दिला, म्हणून ते नगरला होते. त्या वेळी आम्ही रोज सकाळी नगरच्या भुईकोट किल्ल्यावर फेऱ्या मारत असू. नंतर मी एकटाच मित्रांसोबत धावायला जाऊ लागलो. सातभाई गल्ली ते सावेडी अशी आमची नियमित दौड होती.

त्यांना कोट घालण्याची आणि घड्याळ बाळगण्याची विशेष आवड होती. माझ्या लग्नाचा कोट त्यांनी कितीतरी दिवस घातला होता. सतत घड्याळाकडे पाहणे ही त्यांची सवयच होती. लहानपणी ते मला खोपे मामांकडे घेऊन जात असत. ते आशा टॉकीज मध्ये मॅनेजर होते. मामांशी गप्पा सुरू असताना ते मला

सिनेमाच्या आसनावर बसवीत. त्यावेळी बरेच सिनेमे (कळत काही नव्हते) पाहायला मिळाले. 'सांगते ऐका' हा सिनेमा अनेक दिवस चालला होता आणि वारंवार पाहून त्यातील प्रसंग आणि गाणी मला पाठ झाली होती.

नगरमधील भंडारे मामांच्या प्रेसमध्ये मी अक्षर जुळविणे, बाइंडिंग करणे आणि पावती पुस्तके क्रमांकित करणे यांसारखी कामे मोठ्या उत्सुकतेने पाहत असे. एसएससीच्या काळात संगमनेरच्या एका प्रेसमध्येही काम करण्याचा योग आला. लहानपणी झोपताना दादा आम्हाला गमतीदार गोष्टी सांगत असत, जसे की 'दोन सोबती', 'भक्त प्रल्हाद', 'राजा डुकराचे कान' इत्यादी., भारत पाकिस्तान चीन युद्ध या काळात आकाशात विमाने जाऊ लागले की मी त्यांना बिलगून झोपत असे.

दादांनी कधीही कोणासमोर हात पसरला नाही. ते म्हणत, "आपल्या कुवतीनुसारच खर्च करावा, गरजा कमी ठेवाव्यात, आणि कधीही कोणासमोर तगादा लागण्याची वेळ येऊ नये." आई नेहमी अभिमानाने म्हणत असे , "माझे चार पुत्र चार लाल आहेत, दशरथाच्या पुत्रांसारखे! "

दादा नगरला विणकाम करत असत. काही काळ ते सिन्नरला पिठाच्या गिरणीवर देखील काम करत होते, आपल्या मुलांची लग्न जुळवताना पत्रिका जुळत नसतील आणि मुलगी पसंत असेल तर दादा मुलींची नावे बदलत व जुळणारी रास करीत. त्यांचे म्हणणे होते की, "प्रत्येक समस्येला उपाय असतो, तो शोधायचा असतो. परमेश्वराच्या इच्छेविरुद्ध काहीच घडत नाही." ते देवभक्त होते पण अंधश्रद्धा त्यांना मान्य नव्हत्या. त्यांच्यात देशभक्ती ठासून भरलेली होती. त्यांच्यावर विशिष्ट विचारांचा पगडा होता. ते देश स्वातंत्र्यासाठी जिवाची आहुति देणाऱ्या देश भक्तांना मानायचे. खोटेपणा त्यांना कधीच आवडत नसे.

वडिलांचे कष्ट, मार्गदर्शन आणि प्रेम यांचा माझ्या जीवनावर अमिट प्रभाव आहे. त्यांनी कधीही थांबण्याचे नाव घेतले नाही. त्यांच्या प्रत्येक कृतीमध्ये अथक परिश्रमाचा गाभा होता. मेहनतीचे जे फळ मिळते, त्यात खरे समाधान असते, हे मी त्यांच्याकडूनच शिकलो.

त्यांचे मार्गदर्शनही अनमोल होते. ते केवळ कुटुंबप्रमुख नव्हते, तर माझे जीवनमार्गदर्शकही होते. त्यांनी नेहमीच सांगितले की, "जीवनात कधीही हार मानू नकोस आणि स्वप्नपूर्तीसाठी संघर्ष करावा लागतो." त्यांच्याशी असलेल्या संवादांतून आत्मविश्वास मिळाला. त्यांच्या विचारसरणीत स्पष्टता होती, आणि त्यांचा दृष्टिकोन नेहमी प्रेरणादायी असायचा.

त्यांचे प्रेमही अमूल्य होते. त्यांनी कधीही प्रेमाच्या गोडगोड शब्दांची गरज भासू दिली नाही; त्यांच्या कृतीतूनच ते स्पष्ट होत असे. त्यांच्या प्रेमातून मी शिकलो की, जीवनात प्रेम आणि कृतज्ञता अत्यंत महत्त्वाची आहेत. त्यांच्याशी असलेल्या संवादांनी मला आत्मविश्वास, परिश्रम आणि साधेपणाचे महत्त्व शिकवले. त्यांचे जीवन माझ्यासाठी आदर्श आहे, आणि त्याच मार्गावर पुढे जाण्याची माझी तयारी आहे.

बाप

शाळेपासून बापाच्या धाकात तो राहत असतो,
कमी मार्क पडले की प्रगतीपुस्तक लपवत असतो,
आईच्या पाठी लपून बापाशी बोलत असतो,
डोळा चुकवून हुंदडायला जात असतो…

शाळा संपते, नव्या जगाचे दरवाजे उघडतात,
कॉलेजच्या भुलभुलैयात मन हरवून जाते,

हाती असलेले मार्क घेऊन तो पायऱ्या झिजवत फिरतो,
बाप नव्या स्वप्नांच्या आशेने मार्गदर्शन करतो…

परीक्षा संपतात, डिग्री हाती पडते,
नोकरीसाठी मुलगा झगडू लागतो,
बाप मात्र पाठिंबा देत राहतो,
स्वतःची झीज विसरून मुलाच्या उज्ज्वल भविष्यासाठी झटतो…

लग्न होते, संसार थाटला जातो,
नव्या जबाबदाऱ्यांनी बापाचे मन भारावते,
आता नव्या बापाला जुन्या बापाचे मन समजते,
आणि त्याच्या कष्टांची जाणीव होते…

बापाच्या कडक शिस्तीमागे प्रेमाचा झरा असतो,
त्याच्या डोळ्यांतून झळकणारे पाणी कधी बाहेर येत नाही,
तो स्वतः उन्हात तगतो, पण घरट्याला सावली देतो,
स्वतः कमी खाऊन लेकरांना सुखात ठेवतो…

बापाचे मन आकाशासारखे विशाल असते,
त्याचा आधारही हिमालयाएवढा भक्कम असतो,
आईच्या मऊशार तळव्यामागे बापाचा राकट हात असतो,
आणि हे सर्व कळते, जेव्हा स्वतः बाप बनावे लागते…

असेच होते माझे आदर्श दादा!

माझी माय - आईच्या आठवणी – एक अमोल ठेवा

जन्म १० फेब्रुवारी १९१० मृत्यू ११ जुलै २००३

आई – भक्ती, प्रेम, तीर्थयात्रा

आई म्हणजे वात्सल्याचा अविरत झरा. माझ्या जीवनातल्या अनेक छोट्या मोठ्या क्षणांमध्ये आईची माया, तिचे संस्कार आणि तिचा सोबत असलेला आधार आजही स्पष्ट जाणवतो.

आई, तिचे नाव शांताबाई ! नावाप्रमाणेच शांत स्वभावाची. पहाटे उठून तांब्याचा बंब पेटवायची. मोठ्या घंगाळात पाणी गरम करून मला अंघोळ घालायची आणि हाताला धरून मंदिरांत काकड आरतीसाठी न्यायची. लक्ष्मीनारायण मंदिर, शनी मंदिर, राधाकृष्ण, मारुती, गणपती, दत्त आणि महादेव – ही तिची दररोजची नित्यक्रमाची तीर्थयात्रा. प्रत्येक देवापुढे ती "सदासर्वदा देव माझा पडावा" अशी प्रार्थना करायची. त्या प्रार्थनेचे काही शब्द चुकीचे असले, तरी तिचा भक्तिभाव शुद्ध आणि पवित्र होता. तीची प्रार्थना, तीची भजने – माझ्या बालमनावर कायमची कोरली गेली. कधी आई-दादा रात्री ज्ञानेश्वर मंदिरात प्रवचनाला जात, तर कधी मला बरोबर नेत. प्रवचन समजायचं नाही, पण मला झोप येत असे. दादा मग मला हलकेच उचलून पाटकुळी घेऊन घरी आणायचे.

आईला तीर्थयात्रांची अपार आवड होती. तिच्या मनात या यात्रा म्हणजे केवळ देवदर्शन नाही, तर ती तिच्या श्रद्धेचा, भक्तीचा आणि आंतरिक समाधानाचा एक सुंदर प्रवास होता. ती प्रत्येक वेळेस मला आपल्यासोबत घेऊन जायची – लहानपणापासूनच. मला आठवतंय, मी अगदी लहान असताना ती मला खांद्यावर घेऊन वणीच्या गडावर चढायची. त्या काळी रस्ते कच्चे होते, वाहनांची सोय कमी होती, तरी तिच्या उत्साहात कधीच खंड पडला नाही. माझं वजन, उन्हाचे चटके, लांबचा प्रवास – काहीही तिचा उत्साह कमी करू शकलं नाही. दादा मात्र कधीच या यात्रांमध्ये सहभागी झाले नाहीत. त्यांच्या जबाबदाऱ्या वेगळ्या होत्या.

आईला फोटो काढायला फार आवडायचं. त्या काळी फोटो काढणं ही फारशी सामान्य गोष्ट नव्हती. पण जेव्हा संधी मिळायची, तेव्हा ती अगदी सावरून, नीट साडी नेसून, केसांचा गजरा लावून कॅमेरासमोर बसायची. तिच्या चेहऱ्यावर एक अलौकिक शांतता आणि आत्मविश्वास झळकायचा – जणू ती त्या क्षणात स्वतःला जगत आहे.

माझी आई खूप हौशी होती. नातेवाईक तिच्या जिव्हाळ्याचे विषय होते. ती मला नेहमीच नातेवाईकांकडे घेऊन जायची. घरातही कोणी पाहुणा आला की त्याचे स्वागत अगदी मनापासून करायची. पाहुण्यांची मोठी ठेप ठेवायची. कितीही थकवा आला तरी आईने कधीच कंटाळा केला नाही. घरातली परिस्थिती जरी साधी असली तरी आईने सगळ्यांची काळजी घेतली. जावयांना सणावाराला अगदी मानाने बोलावले जायचे. अधिक मासात वाण देण्याची तिची परंपरा होती.

नागपंचमीला फुगड्या खेळणे, मोठमोठे झोके घेणे, गाणी म्हणणे हे सगळे तिला आवडायचे. ती राजा हरिश्चंद्राची कथा गाण्यात सांगायची. कथा

सांगताना तिचा आवाज भावनिक व्हायचा आणि ती स्वतःच त्या भावनांमध्ये हरवून जायची.

तीर्थयात्राही तिला खूप प्रिय होत्या. मला बरोबर घेऊन जायची.

एकदा वणीच्या जत्रेत माझा एक खास फोटो काढला गेला होता – मी त्या वेळी एका आकर्षक जरीच्या टोपीत होतो. ती टोपी नवीन होती, आईनेच खास माझ्यासाठी घेतलेली. त्या फोटोत मी सगळ्यांच्या पुढे , चेहऱ्यावर निरागस हास्य होतं. आईला तो फोटो फारच प्रिय होता. ती तो कौतुकाने सर्व नातेवाइकांना, शेजाऱ्यांना दाखवायची. "हे बघा माझं बाळ किती गोंडस दिसतंय" असं म्हणत तिच्या डोळ्यांत अभिमानाची आणि प्रेमाची चमक असायची. दुर्दैवाने तो फोटो नंतर कुठे सापडला नाही – काळाच्या ओघात हरवून गेला. पण मला आजही आठवतंय, त्या फोटोचा उल्लेख होताच तिच्या चेहऱ्यावर उमटणारा तो निरलस आनंद – तो चेहरा, तो क्षण, आणि तिचं ते मनापासूनचं प्रेम, हे सगळं माझ्या आठवणींच्या कपाटात जपून ठेवलेलं आहे.(हा फोटो कोणाकडे असल्यास शेअर करावा)

त्र्यंबकेश्वर, आळंदी, पंढरपूर, गाणगापूर – ही सगळी तीर्थस्थळं तिच्यासाठी यात्रेच्या नकाशावरील ठिकाणं नव्हती, तर तिच्या अंत:करणातील श्रद्धेचे कळस होते. प्रत्येक ठिकाणी तिची एक आगळी भावना, एक वेगळी कथा आणि एक खास आठवण जोडलेली होती. आणि त्या प्रत्येक आठवणीत मी होतो – तिच्यासोबत, तिच्या सावलीत, तिच्या प्रेमात न्हालेला.

आईला पाहुण्यांचे, नातेवाईकांचे विशेष प्रेम होतं. ती मला नातेवाईकांकडे नेमाने घेऊन जायची. घरात कोणीही पै पाहुणा आला, की तिने त्यांच्या पाहूणचारात कधीच कसर ठेवली नाही. स्वतःच्या थकव्याकडे दुर्लक्ष करत, ती

सगळ्यांची सेवा करायची. सणासुदीला तसेच अधिकमासात वाण देण्याची , जावयांना मान देण्याची परंपरा ती जपायची.

नागपंचमीच्या दिवशी फुगड्या खेळणं, मोठे झोके घेणं, गाणी म्हणणं – हे सगळं तिच्यातील उत्साहाचं दर्शन घडवायचं. राजा हरिश्चंद्राची कथा ती गाण्यातून सांगायची – तिचा आवाज त्या क्षणी भावनांनी थरथरायचा. ती भावुक व्हायची. गणपतीच्या चतुर्थीला उपवास सोडल्यानंतर ती कथा सांगायची. मला झोप लागलेली असली, तरी नैवेद्यानंतर चंद्रदर्शनासाठी ती मला उठवायची – अगदी हळूवार स्पर्शाने.

आठवणींचं विश्व

माझं बालपण अगदी साधं, पण नितळ होतं. आई मला सागरगोटे, लिंगोर्च्या, पतंग, खोखो, हुतुतू खेळायला प्रोत्साहन द्यायची. घरी मातीच्या (त्याला भेंडा म्हणायचे) विटा बनवणं, बांधकामासाठी चिखल कालवणं – यामध्ये मी मदत करायचो. आम्हाला वाटायचं, घर बांधणं म्हणजे विटा रचणं – पण आईला माहिती होतं की खरं घर माणसांच्या मनांत उभं राहतं.

आईला नाकात नथ, गळ्यात सरी घालायला फार आवडायचं. सणावाराच्या दिवशी तिचे सौन्दर्य खुलायचे. ती स्वतःच्या साजशृंगारात ते अनुभवायची. पण तिचं खऱ्या अर्थाने सौंदर्य होतं – तिच्या मायेच्या, श्रद्धेच्या, आणि निःस्वार्थ सेवाभावाच्या रूपात.

एका आठवणीचा प्रसंग फार वेगळा आहे – बाबुराव पाटणकर यांच्या साळीवाड्यातील लाकडी बल्ल्या पावसामुळे वाहून जाण्याच्या स्थितीत होत्या. लोकांनी त्या वाचवण्यासाठी बल्ल्या लिंबाच्या झाडाला चऱ्हाटाने बांधल्या. घरात पाणी ठिपठिप गळत होतं. आम्ही छत्र्या उघडून घरात बसलो होतो. तरी

आईने आषाढी एकादशी निमित्त साबुदाण्याची खिचडी, थालपीठ, रताळ्याचा गोड चाप आणि तिखट कीस बनवले. म्हणाली, "पाऊस असला तरी व्रत चुकता कामा नये!" आणि गरमागरम थालपीठ ताटात वाढले.

आमचे कुटुंब मोठं होतं – चार मुले आणि चार मुली. आईची शिस्त आणि कुटुंब टिकवण्याची तळमळ सगळ्यांसाठी प्रेरणा होती. जीवनात अनेक संकटं आली, पण आईने ते समर्थपणे झेलले. तिला इच्छा होती की तिचा शेवटचा प्रवास तिच्या चार मुलांच्या खांद्यावर व्हावा – ती पूर्ण झाली. ती नेहमी आम्हा भावंडांची ओळख "माझे चार लाल" अशीच करून द्यायची.

लहानपणी माझी शरीरयष्टी खूपच बारीक होती , त्यामुळे मला शाळेत प्रवेश मिळवणं कठीण होतं. आई अनेकदा हेडमास्टरांकडे जाऊन मला प्रवेश देण्याची विनंती करायची, पण त्यावेळी जन्मपत्रिका नव्हती. आमच्या घरात चार भाऊ आणि चार बहिणी होत्या, त्यात मी सगळ्यात धाकटा—शेंडे फळ. मुलांमध्ये आण्णा यांचा नंतर सुमारे २५ वर्षांनी माझा जन्म झाला. त्यामुळे आई व दादांना मी लहान असलो तरी खूप लाडका होतो.

मायेच्या स्पर्शातली देवाची कृपा

तो काळ साधारण १९५७ चा असावा. मी चार-पाच वर्षांचा असेन. त्या कोवळ्या वयात माझ्या जिवाला विषमज्वर — टायफॉईड लागले. आई-दादांचा जीव टांगणीला लागलेला. माझे डोळे तापाने गहिरलेले, देह गळलेला, चेहरा सुकलेला होता. आईच्या डोळ्यांत काळजीचे सावट पसरलेले, तिच्या वात्सल्यभरल्या नजरा अजूनही मनात तरळतात.

"बाबू, माझ्या सुभाषबाबूला काही होऊ नये… देवाने ऐकायला हवे…" ती स्वतःशीच पुटपुटायची. तिचा प्रत्येक श्वास माझ्या बचावाची प्रार्थना असे; तिची माया जणू माझ्या आजाराशी लढत होती.

त्या काळातील वैद्यकीय सोयी मर्यादित होत्या. माधव दाजींच्या ओळखीचे डॉ. देशपांडे उपचार करत होते, पण त्यासोबत घरच्या गंडे-दोरे, अंगारे-धुपारे, नवससायास काहीही कमी नव्हते. आई प्रत्येक देवळात माथा टेकत होती, नवस बोलत होती — "देवा, माझ्या बाबूला वाचव… मी तुला नवस करते."

दादा जुन्या आयुर्वेदिक ग्रंथांतून औषध शोधत असे. "हे गुळवेल तापासाठी चांगले… त्याचा काढा देऊ बाबूला," असे म्हणत. आई माझ्या डोक्यावर मिठाच्या पाण्याच्या पट्ट्या ठेवत होती. रात्री अपरात्री मी चुळबुळलो की ती हळुवार हाताने माझे कपाळ कुरवाळायची. त्या स्पर्शात मायेचा उबदार ओलावा होता — जणू पहिला औषधोपचारच.

घरात तळण-भाजण बंद, सणवार साधेपणाने साजरे होत. आईची नजर सतत देवघराकडे लागलेली. दारात पाटणकर मामा दररोज भेटायला येत, "बाबू, लवकर बरा हो बाबा… देवावर भरोसा ठेवा," असे म्हणत. माधव दाजी आणि आक्का माझा मानसिक आधार बनले होते, कधी फळं, कधी औषधं घेऊन.

आजारातून सावरतो न सावरतो, तोच हायड्रोसीलचा त्रास सुरू झाला. नागलीच्या पानाने शेक, एरंडाच्या पानाच्या पट्ट्या — घरगुती उपाय सुरु झाले. आर्थिक परिस्थिती हलाखीची झाली; घरातील मोठी पितळेची भांडी विकावी लागली. तरी आईचा विश्वास ढळला नाही. ती फक्त देवाची प्रार्थना करत राहिली आणि माझ्या कपाळावर मायेचा हात ठेवत राहिली.

नंतर सरकारी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार टोन्सीलचे ऑपरेशनही झाले. आई-दादांचे जीवातले जीव, त्यांचा निरंतर आधार, मला लहानपणापासूनच सुरक्षित आणि संरक्षित वाटण्यास कारणीभूत ठरले. त्यांच्या मायेच्या वर्षावाने आणि प्रार्थनेच्या ताकदीने मी बरे झालो.

आज हे आठवताना आई-दादांचे अपार प्रेम, त्यांची काळजी आणि त्याग डोळ्यांसमोर उभे राहतात. आईचे हात माझ्या कपाळावरून फिरताना जणू देवाच्याच हातांनी मला जीवनदान दिले. तिच्या मायेच्या वर्षावानेच मी आज इथपर्यंत आलो. आईचा उबदार हाताचा स्पर्श अजूनही मनातील ताप हलका करतो, आणि प्रत्येक आठवणीत तिच्या मायेची उब कायम राहते.

आई आणि दादांना वाटतं होतं की माझं शिक्षण महत्त्वाचं आहे, आणि ते मला लवकर शिकवू इच्छित होते. म्हणूनच आई मला वारंवार नेहुलकर गुरुजींकडे घेऊन जायची. गुरुजी पण म्हणायचे, "पाळण्यातील पोर आणा, शिकायला." पण आईच्या हट्टामुळे, शेवटी हेडमास्टरांनी मला प्रवेश दिलाच .

मी ज्या शाळेत जात होतो ती शाळा शीतलामाता मंदिराच्या जवळ होती, रंगारगल्लीतील म्युनिसिपालिटीच्या भाजी मार्केटमध्ये. त्या शाळेचे जोशी गुरुजी होते. ते आमच्याकडून मोठ्या आवाजात पाढे, बाराखडी म्हणून घेत शिकवायचे. **सुट्टीत आमचा एक मजेदार कार्यक्रम असे.** शाळेच्या मागील खोलीत उंदीर पकडून ठेवणारा एक माणूस येत असे. त्याचे पिंजरे उंदरांनी भरलेले असायचे. आम्ही ते पाहायला उत्सुक होऊन डोकावत असू.

शाळेच्या चौकात एका मित्राकडे मोरपंखी किडे पकडायचो. त्यांना "भिंग" म्हणायचं, आणि त्यांना गुंजपाला खायला देत असू. आई माझ्या मित्रांवरही खूप प्रेम करायची. ती त्यांना खूप चांगल्या पद्धतीने चौकशी करायची, आणि त्यांना

हातावर काहीतरी खायला द्यायचीच . तिच्या दृष्टिकोनानुसार, चांगले मित्र असणं खूप महत्त्वाचं होतं. माझे मित्र जेंव्हा केंव्हा घरी अभ्यासासाठी किंवा खेळायला यायचे तेंव्हा ती मोठया आपुलकीने, प्रेमाने त्यांची चौकशी करायची. घरात बोलवायची . हातात शेंगदाणे फुटाणे द्यायची. आमच्या मैत्रिकडे कौतुकाने पाहायची. हे करताना तिने त्यांचा जात धर्म कधीच आड येऊ दिला नाही. नव्हे त्याबद्दल उल्लेखही केला नाही.

पाच पैशांचा अमोल ठेवा

एकदा शाळेतून आल्यावर मी गल्लीत मुलांबरोबर खेळायला लागलो. खेळता खेळता तात्यांच्या (चुलत्यांच्या) ओट्याकडे गेलो. ओटा उंच होता, समोर पारिजातकाचा वेल आणि जमिनीवर पांढऱ्या फुलांचा सडा. वेलीच्या बुंध्याजवळ काहीतरी चमकलं. खाली उतरून पाहिलं तर पाच पैशाचं नाणं! त्या वेळेला पाच पैसे म्हणजे मोठी गोष्ट. मी ते उचलले. मनात विचारांचा गोंधळ – आईला सांगायचं की नाही? पण निर्णय घेतला – काही खाऊ न घेता अभ्यासासाठी काहीतरी उपयोगी घ्यायचं.

मी कांबळे यांच्या दुकानात गेलो. पाच पैसे टेबलावर ठेवून थरथरत "पेन्सिल पाहिजे" असं सांगितलं. दुकानदाराने विचारलं, "कुठून आले पैसे?" मी सगळं सांगितलं. त्याने डोक्यावरून हात फिरवून मोठा पेन्सिलीचा पुडा दिला. एवढ्या छोट्या रकमेची मोठी भेट!

घरी आल्यावर मी आईसमोर पाठीमागे हात लपवून उभा राहिलो. तीने विचारलं – "काय झालं रे बाबू ?" मी हातातील पुडा पुढे केला आणि सगळं सांगितलं. तिच्या डोळ्यात अभिमानाचे अश्रू आले. म्हणाली, "किती गुणाचा

माझा बाळ!" आणि प्रेमाने मिठीत घेतलं. स्वतःसाठी खाऊ किंवा खेळणे न आणता मला हवा तो पेन्सिलचा पुडा घेतला होता.

आईच्या त्या मिठीत मला जग जिंकण्याची उब मिळाली. तो क्षण माझ्या जीवनाचा आत्मविश्वासाचा पहिला आधारस्तंभ ठरला. ती पाच पैशांची गोष्ट माझ्यासाठी अनमोल होती. आईच्या स्वप्नांची खरी सुरुवात होती ती!

पाचवी ते एसएससी पर्यंतचा माझा शालेय काळ संगमनेर येथे गेला. हा काळ आमचेसाठी खूप खडतर आणि कठीण होता . पाचवी ते सातवी या कालखंडात, मला आवारी गुरुजी शिक्षक होते, जे खूप कडक शिस्तीचे होते. त्यांचा मुलगा सुरेशला चित्रकलेची खूप आवड होती. तो सतत व्यक्ती रेखा काढण्यात आणि रंगविण्यात गर्क असायचा,त्याने आई दादांचे एक सुंदर असे रंगीत चित्र काढले होते. मी संगमनेर सोडल्यावर ते चित्र कोणाकडे गेले माहीत नाही. (कोणाकडे असल्यास ग्रुपवर शेअर करावे. तसेच काही आठवणींचे फोटो असल्यास ग्रुप वर पाहायला आवडेल)

कच्च्या भिंतींचा पक्का आधार – माझी आई

आमच्या पुढच्या घराची विक्री झाल्यानंतर, मागील घराची अवस्था अत्यंत खराब झाली होती. पावसाळ्यात घर सारखे गळायचे. घराला केवळ राहत्या घरासोबत जोडणारी एकच भिंत मजबूत होती; बाकी सर्व भिंती पूर्णपणे पडल्या होत्या. एका बाजूला भागवत दादांचा गुरांचा गोठा होता, तर दुसऱ्या बाजूला दळवींची बखळ, जिथे डुकरांचा वावर असायचा . त्यामुळे दोन्ही बाजूंनी दुर्गंधी आणि घाण भरलेली होती. घराच्या भिंती पडल्यामुळे, पावसाळ्यात आम्हाला खूप त्रास सहन करावा लागला. पाऊस संपला की,

आई आणि दादा मातीच्या विटा (भेंडा) तयार करून घराची बांधणी करत आणि पडझड झालेल्या भिंतींना डागडुजी करत.

आईचे काम पाहून मी मदत करायला सुरुवात केली—चिखल मळणं, विटा तयार करणं, त्यांना उचलून वर देणं अशी कामं मी करत होतो. कधी कधी आई एकटीच सर्व कामं करायची. मी शाळेत असताना, ती संपूर्ण दिवस घरकामात राबायची, पण मला अभ्यासात व्यत्यय येवू नये म्हणून ती मला कामाला लावायची नाही. दिवाळीच्या सणात, घराच्या पडझडीची डागडुजी करण्यासाठी आणि भिंती लिंपण्यासाठी ती खूप मेहनत घेत असे. मला आठवते त्या दरम्यान, दोन वेळा ती शिडीवरून पडली होती. आई सांगायची मी शिडीवर चढले पण मला कोणीतरी फेकून दिले असे वाटले. खूप भाबडी होती माझी आई!

दादांना स्वतःचे काम स्वतः करण्याची सवय होती. त्यांचा एक खास दिनक्रम होता – झोपण्यापूर्वी आणि उठल्यावर भरपूर पाणी पिण्याची त्यांना आवड होती. आई नेहमी त्यांच्या उशाशी पाण्याने भरलेला तांब्याचा लोटा ठेवायची. सकाळी मी लवकर उठून अभ्यासाला बसावं म्हणून, तिने मला अनेकदा पायाने हलवून उठवलंही आहे!

घराच्या भिंतींच्या पडझडीला तोंड देत, आम्ही बारदान लावून भिंतींना आडोसा तयार केला होता. घराच्या मधल्या ढाऱ्या खाली, वाकलेल्या वास्यांच्या आधाराने उभ्या असलेल्या त्या छपराखाली मी अभ्यास करत असे. खांब केव्हाही कोसळू शकतील, याची जाणीव असूनही अभ्यासाच्या महत्त्वामुळे मी त्याकडे दुर्लक्ष करत असे.

संध्याकाळी दादा कामावरून परतल्यावर नवनाथ व इतर देवांच्या पोथ्या वाचत. पोथी मला ऐकवण्याचा त्यांचा आग्रह कधीच नसायचा, पण त्यांच्या वाचनातून माझं कल्याण व्हावं, अशी त्यांची श्रद्धा होती. कंदील आणि

चिमणीच्या मंद प्रकाशात माझा अभ्यास आणि त्यांचं पोथीवाचन दोन्ही सुरू असायचं. पोथी सुरू होताना आणि संपताना मी देवाला नमस्कार करत असे. त्या वेळी आई मात्र रिकामी बसत नसे; विक्रीसाठी कापसाच्या वाती वळण्याचं तिचं काम अखंड सुरू असायचं.

आईच्या सांगण्यावरून दादा अधून मधून माझ्यासाठी पावशेर शेंगदाणे आणायचे—तेच माझे बदाम! कधी कधी आई कडक खारीक आणायची. खरे बदाम तर फक्त पूजेच्या सामानातच पाहायला मिळत. तेही कवच असलेले. दादांना खाण्याचा फारसा मोह नसायचा, पण पुरणपोळीचा स्वयंपाक असेल तर ते आनंदाने जेवायचे. कुरडई, पापडी, आणि आमटीतील तळलेले भजे त्यांना खास प्रिय होते. सणावाराला आई हे सगळे करायची. आईच्या हाताला विशेष चव होती. (सुनीता आताही पक्ष पंधरवडा अक्षय तृतीया अथवा त्यांचे स्मरण दिनी हे पदार्थ आवर्जून करते त्यांचे स्मरणार्थ !)

आईची निःशब्द संघर्षगाथा

हायस्कूलमध्ये शिकत असताना आमचं घरचं आर्थिक स्थिती अतिशय कठीण होती. वडील आणि आई दोघंही मोलमजुरी करून संसार चालवायचे. घर चालवण्यासाठी त्यांना अमाप कष्ट घ्यावे लागायचे, आणि आम्हीही जमेल तशी मदत करत असू. त्या काळात उदरनिर्वाहासाठी आम्ही शेळ्या आणि कोंबड्या पाळल्या होत्या. त्यांचं पालनपोषण, त्यांची देखभाल हे सगळं आई अत्यंत मन लावून आणि मेहनतीने करायची.

कोंबड्यांची अंडी आणि शेळ्यांची करडी बाजारात नेऊन विकणे, त्यांच्यासाठी चारा आणणे, वेळेवर औषध देणे—हे सगळं आईच्या रोजच्या कामाचा अविभाज्य भाग होतं. मीही शक्य तेवढी मदत करत असे. आमचं घर

लहान असल्यामुळे, जिथे कोंबड्यांची खुराडं ठेवलेली होती, तिथेच माझी अभ्यासाची जागा होती. त्या जागेत मी आणि माझे मित्र अभ्यास करत असू.

कधी शेळ्यांना किंवा बकऱ्यांना आजार होत असे, त्यांच्या जीवावर बेतायची वेळ यायची. मांजरी–बोके कधीमधी कोंबड्या उचलून नेत असत. पण या सगळ्या अडचणींनी आई कधीही खचली नाही. तिची जिद्द आणि चिकाटी विलक्षण होती. पुन्हा पै-पै साठवत तिने भांडवल उभं केलं, नव्या कोंबड्या आणल्या, शेळ्या पाळायला सुरुवात केली आणि हा उपक्रम पुन्हा सुरू ठेवला. घराच्या आर्थिक गरजांसाठी हे तिचं श्रमसाध्य काम किती महत्त्वाचं होतं, याची मला आजही जाणीव होते.

याव्यतिरिक्त, आई गावातील एका खानावळीत पोळ्या करायला जायची. गरम तव्यावर सतत पोळ्या थापताना तिचे हात पोळून निघायचे. त्यावर लावायला मलम वगैरे काही नसल्यामुळे ती फक्त गावठी उपाय करून, वेदना सहन करत, दुसऱ्या दिवशी पुन्हा त्याच जिद्दीने कामाला जायची. कधी हातावर फडके बांधूनही ती काम थांबवत नसे. तक्रार नाही, थकव्याची हाक नाही— फक्त कुटुंबासाठी तिचं निःशब्द पण अढळ परिश्रमच!!

पायात वहाणाही नसताना उन्हा-पावसात अनवाणी पायांनी ती चालत जायची. आजही ते दृश्य डोळ्यांसमोर उभं राहिलं की डोळे पाणावतात. आईच्या त्या काळातील अपरंपार कष्ट, तिची जिद्द, त्याग आणि मायेचं अस्तर असलेली संघर्षयात्रा आजही माझ्या मनाला खोलवर स्पर्श करते आणि आयुष्यभर प्रेरणा देते.

आईचे आणि घरातील इतर कष्ट पाहून मीही लहानमोठी कामं करून मदत करत होतो. कधी किराणामालाच्या दुकानात नोकर म्हणून, तर कधी हमालाचं

काम करून घरखर्चाला हातभार लावत असे. काम काय आहे, कसं आहे, हे मला कधी महत्त्वाचं वाटलं नाही—महत्त्वाचं होतं ते घरचं ओझं हलकं करणं. आई-वडिलांचं स्वप्न होतं की मी शिक्षण पूर्ण करून मोठा होऊन त्यांचा अभिमान व्हावं, आणि त्या स्वप्नासाठीच मी मनापासून कष्ट करत होतो.

बँकेच्या नोकरीसाठी इंटरव्ह्यूचा कॉल आल्यानंतर माझ्या पहिल्या इंटरव्ह्यूला, तसेच नोकरीला रुजू होण्यासाठी दादा माझ्यासोबत होते. आई आणि दादा या दोघांचाही आनंदाला पारावर नव्हता.

आई दादांसह म्हैसूर, कन्याकुमारी, रामेश्वरम आणि मीनाक्षीपुरम येथील १९८३ सालातील आठवणी

त्यांच्या कष्टांची परिपूर्णता जणू त्या क्षणी साकार झाली होती. त्यांचा आनंद ओसंडून वाहत होता, पण माझ्या मनात मात्र सतत एकच विचार घोळत होता, *"नोकरी नीट जमेल का?"* दादांनी आमच्या साहेबांना भेटून, "माझ्या मुलाची काळजी घ्या," अशी मनापासून विनंती केली. मला आजही वाटतं, मला वाटतं की आईचाच आग्रह असावा, ज्यामुळे दादा मला सोबत घेऊन गेले. तिचं मन कदाचित म्हणत होतं— "माझ्या लेकराला पहिल्या पावलावर एकटं सोडू नका !"

रामेश्वर ते मीनाक्षी: कुटुंबाच्या आनंदयात्रा

माझ्या मनात नेहमीच एक इच्छा होती—आईने दादांना चारीधामांपैकी किमान एका तरी धामचं दर्शन घडवावं. मला स्वतःचं प्रवास नियोजन करण्याची नेहमीच हौस होती, आणि अखेर ती संधी आली. आम्ही रामेश्वराला गेलो. तेथे अनेक महादेव पिंडांच्या दर्शनाने आईचा आनंद गगनात मावेना. तिने माझ्या गालावर प्रेमाने हात फिरवला आणि दादांच्या चेहऱ्यावरही समाधानाची छटा स्पष्ट दिसत होती. त्या पवित्र दर्शनामुळे आमचा प्रवास अधिकच आनंददायी झाला.

समुद्रकिनाऱ्यावर पिंडदानाची पूजा करण्याचा विचार मी मांडला. पण दादा प्रथम तयार नव्हते. "हे सगळे पूजापाठ म्हणजे थातूरमातूर आहे," असं त्यांच्या ठाम निरीक्षणात होतं. तरीही, मी त्यांना पुन्हा पुन्हा विनवलं आणि शेवटी त्यांनी पूजा केली. त्यानंतर आई, दादा आणि माझं मन अगदी हलकं झालं—सर्वांचं समाधान त्या क्षणी पूर्ण झाल्यासारखं वाटलं.

मीनाक्षी मंदिरात पोहोचल्यावर आईच्या आनंदाला पारावार उरला नाही. पूजा करताना तिच्या चेहऱ्यावर दिसणारे मनोभावे समर्पण विलक्षण होतं. मी संपूर्ण कुटुंबाचा विचार करत सर्वांना योग्य ठिकाणी नेण्याची काळजी घेत होतो. आमच्या प्रवासात आम्ही पलानी, कोयंबतूर आणि उटी यांसारखी अनेक ठिकाणं पाहिली. त्या वेळी दादांचे वय ८१ वर्षे आणि आईचे ७४ होते, त्यामुळे त्यांच्या आरामशीर प्रवासाकडे आम्ही विशेष लक्ष देत होतो.

मीनाक्षी मंदिराच्या दर्शनानंतर अचानक आई नजरेआड झाली. क्षणभर सगळ्यांच्या छातीत धस्स झालं. मंदिराच्या प्रत्येक कोपऱ्यात शोध घेतला, दुसऱ्या दरवाजातून बाहेरही पाहिलं, पण ती कुठेच दिसेना. मनात टेन्शन वाढत असतानाच अखेर ती माणसांच्या गर्दीत सापडली—हत्तींच्या खेळात रममाण झालेली! त्या क्षणी सुटकेचा नि:श्वास टाकत आम्ही तिच्या चेहऱ्यावरचा निष्पाप आनंद अनुभवत राहिलो.

दुसऱ्या दिवशी आम्ही मैसूरचा भव्य राजवाडा पाहिला. त्याच्या ऐतिहासिक महत्त्वाने आणि अप्रतिम सौंदर्याने आम्ही सारेच मंत्रमुग्ध झालो. आई आणि दादांच्या डोळ्यांत चमकणारा समाधानाचा प्रकाश पाहून माझ्या मनात एकच विचार पक्का झाला—आमच्या प्रत्येक प्रवासात आई-दादांचा सहभाग असायलाच हवा.

आई-वडिलांनी आयुष्यभर माझ्याकडून काहीही अपेक्षा केली नाही. जे काही होतं त्यात ते नेहमीच समाधानी राहिले. दोघेही कमालीचे सोशीक होते. आमचं संवादाचं स्वरूप कमी शब्दांचं असलं तरी मोठ्या निर्णयाच्या वेळी त्यांचा सल्ला नेहमीच अमूल्य ठरायचा. नोकरीला सुरुवात करताना माझं बालकासारखं दिसणं पाहूनही दादांनी मला एक महत्त्वाचा सल्ला दिला—"सुभाष, पैसा हा विषही ठरू शकतो आणि अमृतही. त्याचा वापर कसा

करायचा आणि कसा पचवायचा हे आपल्यावर अवलंबून असतं. मोहात पडू नकोस, जपून राहा.''

हा त्यांचा सल्ला माझ्या संपूर्ण आयुष्याचा मार्गदर्शक बनला.

आई-वडिलांनी माझ्या शिक्षणासाठी घेतलेले अपरंपार कष्ट आजही मला प्रेरणा देतात. आईचा शेवटचा काळ नगरला अत्यंत शांततेत, संथपणे आणि निःशब्द प्रेमाच्या वातावरणात गेला. वयामुळे शरीर जरी थकलेलं असलं तरी तिचं मन नात्यांच्या उबेत भारलेलं होतं. तिची एक शेवटची इच्छा होती—''माझ्या चारही मुलांच्या खांद्यावरच माझा शेवटचा प्रवास व्हावा.''

ही तिची इच्छा आमच्यासाठी केवळ एक विनंती नव्हती, तर ती एक पवित्र जबाबदारी होती, तिच्या अखेरच्या आशीर्वादाने सजलेली. देवाच्या कृपेने तिची ही अंतिम इच्छा पूर्ण झाली. आम्ही चारही भावांनी तिच्या अंतिम यात्रेला खांदा दिला—डोळ्यांत अश्रू, हृदयात असंख्य आठवणी, आणि ओठांवर तिच्या नावाचं शांत पुटपुटणं घेऊन.

तू होतीस म्हणून मी आहे

तिच्या अखेरच्या दिवसांत आमचा लहान मुलगा अतुल आणि माझी पत्नी सुनिता यांनी अक्षरशः जीव ओवाळून टाकून तिची सेवा केली. आईच्या लहानसहान गरजांपासून ते तिच्या मनःशांतीपर्यंत—प्रत्येक गोष्टीची त्यांनी मनापासून काळजी घेतली. आईला नेहमीच वाटायचं, *''आपल्या लेकरांनी आपल्यासाठी वेळ काढावा, प्रेमाने जवळ बसावं, आपलं डोकं हलकेच कुरवाळावं...''* आणि हे सारे अतुल आणि सुनिताने अगदी ओलावा आणणाऱ्या आपुलकीने पूर्ण केलं..

त्या काळात मी पुण्याला होतो आणि थोरला राहुल कलकत्त्यास होता. प्रत्यक्ष सेवा करता आली नाही, हा एक सल आजही माझ्या आणि राहुलच्या हृदयात खोलवर आहे. आईच्या डोळ्यांत शेवटी किती तरी बोलणं शिल्लक होतं – आणि माझ्या डोळ्यांतही. ते न झालेलं बोलणं, ती न साधलेली नजरानजर – ह्या आठवणी कायम उराशी राहतील. पण एक गोष्ट मला अंतःकरणपूर्वक जाणवते – सुनिताने जी सेवा केली, ती केवळ जबाबदारी म्हणून नव्हे, तर एका मुलीप्रमाणे, प्रेमाच्या आणि ऋणानुबंधांच्या भावनेतून केली. ती तिच्या डोळ्यांतून आईसाठी ओसंडून वाहणाऱ्या मायेची झुळूक होती.आईच्या निधनानंतर माझ्या मनात सुनिताबद्दल विशेष ऋणानुभूती निर्माण झाली. तिच्या त्या मनस्वी सेवेमुळे माझी पोकळी काही प्रमाणात भरली, आणि माझ्या आईला तिच्या शेवटच्या प्रवासात एक नितांत प्रेमळ सोबती मिळाली. त्या सेवेला आज शब्द देणं कठीण आहे, पण त्या भावना मनाच्या गाभ्यात कोरल्या गेल्या आहेत.

आज आई आपल्यात नाही, पण तिची आठवण माझ्या प्रत्येक श्वासात आहे. तिचं ममत्व, तिचा आवाज, तिचं हास्य, तिचं कुशीत घेणं – हेच माझं वैभव आहे.

"आई म्हणजे निस्वार्थ प्रेम, श्रमांची शिकवण, आणि श्रद्धेचा दिपस्तंभ. तिच्या आठवणींमध्ये मला आजही जगण्याचं बळ मिळतं."

आई, तुझं ऋण कधीच फेडता येणार नाही.
तू होतीस म्हणूनच मी आहे –
हेच माझ्या अस्तित्वाचं खरं कारण आहे.

रम्य ते बालपण

माझे बालपण आठवले की, डोळ्यांसमोर एक सुंदर चित्र उमटते. आई पहाटेच उठून तांब्याचा बंब पेटवायची. तांब्याच्या मोठ्या घंगाळात गरम पाणी काढून मला अंघोळ घालायची. मग मला हाताला धरून काकड आरतीसाठी मंदिरात घेऊन जायची. लक्ष्मीनारायण मंदिर, शनी मंदिर, राधाकृष्ण, मारुती, गणपती, दत्त आणि शेवटी महादेव मंदिर – असा तिचा दररोजचा नित्यक्रम. प्रत्येक देवळात तिने मनोभावे म्हणलेली ती एकच प्रार्थना – "सदासर्वदा देव माझा पडावा" – ("सदासर्वदा देह माझा पडावा" – अशी असायला हवी) आजही माझ्या मनात कायम कोरली गेली आहे.माझ्या मनात अजूनही तीची भजने आणि प्रार्थना रेंगाळत आहेत. मला त्या प्रार्थना पाठ झाल्या होत्या, पण काही शब्द चुकीचे उच्चारले जायचे. मला ते मोठेपणी समजले, पण आईचा तो भक्तिभाव मला त्या लहानशा चुका विसरायला लावायचा.

घरासमोरचा मुंजोबाचा पार आमच्या खेळाचा अड्डा होता. आमच्या घरासमोर मुंजाबाच्या पारावर मोठं लिंबाचं आणि पिंपळाचं झाड होतं. उन्हाळ्याच्या रात्री आम्ही तिथं साडी-धोतरांची मच्छरदाणी टांगून झोपायचो. दादा आणि आई रात्री प्रवचनाला जात असत. काही वेळा मला बरोबर नेत. पण मला ते प्रवचन फारसं समजायचं नाही. माझ्या डोळ्यांवर झोप सवार झाली की दादा मला हळूच पाठकुळीवर घेऊन घरी आणायचे .

आमच्या घराच्या दरवाजाची मात्र खास ओळख होती. मोठ्या जाडजूड लाकडाच्या दाराला उघडताना आणि बंद करताना 'कु S S S S' असा आवाज यायचा. तो आवाज संपूर्ण गल्लीत घुमायचा. त्या आवाजावरून आमचं येणं-जाणं सगळ्या शेजाऱ्यांना कळायचं. त्या आवाजाचा बंदोबस्त करायला तेल टाकावं हे मात्र कधी सुचलं नाही. आता वाटतं — वास्तुशास्त्रानुसार तो आवाज

बंद केला असता तर कदाचित आमच्या आयुष्यातली काही संकटं टळली असती. पण त्यावेळी आमच्या गरजा वेगळ्या होत्या. जगण्याची धडपडच इतकी मोठी होती की अशा छोट्या गोष्टींकडे लक्षच जात नव्हतं.

मी हायस्कूलमध्ये असताना काहीजण आणि मी नोकरीला लागलो तोपर्यंत खोपे आणि दातरंगे दाजी मला 'बाबू' म्हणत असत. मात्र, माझ्या दुसऱ्या क्रमांकाच्या बहिणीला, जी शिक्षिका होती, मला 'सुभाषबाबू' म्हणणे फार आवडायचे. लहानपणी मी सागरगोटे, लिंगोर्च्या, गोट्या, भवरे, पतंग, तसेच खोखो आणि हुतुतू हे मैदानी खेळ आवडीने खेळायचो. आई मला खेळायला आवर्जून पाठवायची.

माझा चुलत भाऊ सोमनाथ आणि मी वयानं जवळपास सारखेच असल्यामुळे आम्ही नेहमी एकत्र खेळायचो. दादा आणि आई बाजारातून येताना आमच्यासाठी आवर्जून खाऊ आणायचे. भेळीचा एक मोठा पुडा आणला की आम्ही ती निवडत बसायचो. शेव, डाळ, मुरमुरे वेगवेगळे काढून वेगवेगळे खायचो. त्यामुळे भेळ जास्त वेळ खाल्ल्यासारखी वाटायची . त्याची मजा काही औरच होती.

समोर राहणारे गीरगुने यांची रजी खूप छान सागरगोटे खेळायची. आम्ही 'ठीबक्याचा' खेळ खेळायचो. पेन्सिल, खडू किंवा विटकरीच्या तुकड्याने दगडावर किंवा भिंतीवर रेघा मारायचो आणि मोजून ताळमेळ बसवायचो. 'व्यापार व्यापार' खेळताना खोटा वजन काटा वापरायचो. किराणा मालाचे दुकान थाटायचो. मुंजोबाच्या ओट्याजवळच्या कडू लिंबाच्या झाडाच्या निंबोळ्या गोळा करून आम्ही कैऱ्या आणि आंबे समजून बाजार मांडायचो. आंब्याचा रस हातावर घेऊन पिल्यासारखं नाटक करायचो आणि मोठ्या माणसांप्रमाणे घासाघीस करायचो.

गणपती उत्सवात घरात भातुकलीचे करमणुकीचे कार्यक्रम होत. माझा गाण्यांचा आणि नकलांचा कार्यक्रम ठरलेला असायचा. काठीला माईक समजून उभं राहायचो आणि गाणी गात राहायचो. पाचवीच्या पुढे मात्र मी कार्यक्रम पाहायला जाऊ लागलो. सुधीर फडके, जनार्दन पुजारी यांचे कार्यक्रम पाहिलेले आठवतात. लक्ष्मण बाबांच्या यात्रेत तमाशा पहायला जात असे. गण, गवळण समजायचं काही नाही, पण मजा वाटायची. दत्तोबा तांबे, काळू बाळू यांचे तमाशे आठवतात.

लहानपणी 'हाकामारीची' आवई होती. एक म्हातारी रात्री मुलांना पकडून नेते अशी आख्यायिका होती. मी रात्री आई आणि दादांच्या कुशीत कवटाळून झोपायचो. चीन-भारत युद्धाच्या काळात ब्लॅकआउट होतं . घरातून बाहेर उजेड जाऊ नये म्हणून घरांच्या काचांना काळा कागद किंवा काजळी लावत. रात्री विमानाचा आवाज आला की शत्रूचंच विमान वाटायचं.

तात्या संध्याकाळी आले की सायकल ओट्यावर लावत. ती सायकल हातात धरून मी इकडे तिकडे फिरवायचो. मी मस्तीखोर नव्हतो, पण खोड्या करायचो. मैत्रिणींच्या वेण्या ओढायचो. माई म्हणायची, पण मला काही आठवत नाही! माई लहानपणी परकर पोलके घालत असे. दोन वेण्या बांधायची. गोपाळ आण्णा तिला 'पोपट नाकी' म्हणायचे. हे लहानपणाचे दिवस खूप रम्य होते.

आम्ही समोरच्या कांबळेच्या घरात भातुकलीचा खेळ खेळायचो. सायकलच्या चकार्या (रिंगा) आम्ही गरा गरा पालवायचो. त्याची शर्यतही लागत असे. खूप मजा यायची आणि आम्ही त्यात दंगून जात असू. हा खेळ मला खूप आवडायचा कारण त्यामुळे भरपूर पळायला मिळायचं. आम्ही त्याला "चकारी चकारी" म्हणायचो. माझी आणि माधवची (ताईचा दीर) तसेच

सोमनाथाची शर्यत लागत असे. मी आणि माधवने इन शर्ट केलं की ताईचा "अप टू डेट" हा शब्द हमखास निघायचा. ताईला माझा देवानंद टाईप डोक्याचा भांग खूप आवडायचा. तिचाही माझ्यावर खूप जीव होता.

माझा चुलत भाऊ सोमनाथ वयाने माझ्यापेक्षा थोडा लहानच. आम्ही दोघे लहानपणी एकत्र खेळायचो. तो भेटला की अजूनही त्याच्या डोक्यातील एक खोक सर्वांना दाखवतो आणि ती खोक सुभाषकडून लागलेल्या फावड्याची आहे असे सांगतो. मी आई-दादांना पावसात पडलेल्या घराच्या भिंतीसाठी घरी एका लाकडी साच्यात मातीच्या विटा करायला मदत करायचो. त्यांना "भेंडाच्या विटा" म्हणत. बांधकामासाठी चिखल कालवताना मी माझ्या कुवतीप्रमाणे मदत करायचो. त्या वेळी चुकून सोमनाथ मध्ये आला आणि माझ्या हातातील फावडे त्याच्या डोक्यात लागलं, त्यामुळे मोठी खोक पडली.

लहानपणी आम्ही म्हणजे आमचे घर आणि तात्यांचे घर असे वर्षातील सर्व सण एकत्रच साजरे करायचो. तात्या काकूंकडील सगळे आई दादा यांना मोठी आई आणि मोठे बाबा असे संबोधायचे. त्यांच्याकडे दोन मुली आणि आमच्याकडे चार मुली होत्या. अक्का , ताई, बाई आणि माई, तर तात्यांकडील ताई आणि मंगल ! आमचे कुटुंब एकत्र आले की घरातले वातावरण आनंदाने भरून जायचे. त्यामुळे आम्ही सगळे सहा बहिणी आणि मधू भाऊ, नाना,आण्णा आणि मी असे चार तर सुरेश, रमेश, सोमनाथ, आणि सतीश असे तात्यांकडील चार! आठ भाऊ असे मोठे कुटुंब होतो. फरक एवढाच की आमच्याकडे सगळेच (मी सोडून) कमावते होते. आण्णा दिवाळीला एक रूपयाच्या कडक नोटा ओवळणीस टाकत . ते माझे मोठे आकर्षण होते. आमची ताई सर्वात जास्त शिकलेली म्हणून आई-दादांची खूप लाडकी होती. तिचे सर्व लाड पुरवले जात आणि तीही ते लाड करून घेत असे. लग्नानंतर ती शिक्षिका म्हणून नोकरीस लागली. ती सर्व बहिणीत हुशार होती. तिचे पतीही हायस्कूल टीचर होते.

आमची अक्का म्हणजे सर्वात मोठी बहिण, अत्यंत समजूतदार आणि सर्वांना समजून घेणारी. तिचे पती, म्हणजे दाजी, आम्हा सर्वांवर खूप प्रेम करायचे. आई-दादा त्यांना देवमाणूस संबोधायचे. ते संघाचे काम करायचे आणि प्रेसमध्ये जायचे. नंतर हत्ती छाप विडी कारखान्यात मॅनेजर म्हणून काम केले. ते सदा हसतमुख होते. मी त्यांना कधीही रागावलेले पाहिले नाही. मी त्यांचा सर्वात लाडका मेहुणा होतो. ते नेहमी माझ्यासाठी काहीतरी खाऊ आणायचे. दसरा किंवा दिवाळीला अक्काकडे गेलो की माझे खूप लाड होत. फराळ आणि फटाके मिळायचे. आमच्याकडे फटाके घेणे मर्यादित होते, पण अक्काकडून मिळालेल्या फटाक्यांमुळे माझी चंगळ व्हायची.

आमच्या गल्लीत गंगाधर नावाचा लोहार होता. तो बैलगाड्यांच्या चाकांवर धाव बसवायचा. शेतकरी खराब झालेली लोखंडी धाव घेऊन त्याच्याकडे यायचे. तो ती धाव भट्टीत गरम करायचा. लालबुंद गरम झाले की चाकाभोवती ती बसवायचा आणि मग पाण्याने गार करायचा. त्यानंतर ती मजबूत बसली की नाही ते तपासायचा. आम्ही शाळेतून येताना रोज ही प्रक्रिया बघायचो. "अरे बघा रे... किती सफाईदार माणूस आहे तो!" असं एकमेकांना म्हणायचो. त्याच्या हातातील ते कौशल्य आम्हाला खूप कौतुकास्पद वाटायचे. हे दृष्य बघण्यात आम्ही अक्षरशः दंग होऊन जायचो.

त्या लहानशा घरात, त्या साध्या आयुष्यात, आई-दादांच्या मायेच्या कुशीत माझे बालपण कधी उलटून गेले, ते कळलेच नाही. त्या दिवसांच्या आठवणी आजही माझ्या मनात नाजूक फुलांसारख्या दरवळत राहतात.

त्या गोड आठवणी माझ्या मनाच्या कप्प्यात सदैव जिवंत राहतील.

सेवाभावी जीवनाची अमूल्य शिकवण
-आदरणीय दिनकर आण्णांचा प्रेरणादायी प्रवास

(२४-०३-१९३२ ते ३१-१०-२०१५)



आम्ही आठ भावंडं—तीन भाऊ आणि चार बहिणी. मी सर्वांत धाकटा असल्यामुळे आई मला प्रेमाने **"पांक्षीचं फळ"** म्हणायची! माझे तिसरे बंधू **दिनकर आण्णा** हे अत्यंत हुशार, संयमी आणि कुटुंबाची काळजी वाहणारे होते. योगायोग असा की, फेब्रुवारी १९५१ साली त्यांनी एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण केली, आणि त्याच वर्षी जानेवारी महिन्यात माझा जन्म झाला! त्या काळात एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण होणे ही अत्यंत दुरापास्त व अभिमानास्पद गोष्ट मानली जात असे. त्यांच्या सेवाभावी वृत्तीमुळे संपूर्ण कुटुंबात त्यांच्याबद्दल विशेष आदर होता.

दिनकर आण्णांनी आपल्या कारकीर्दीची सुरुवात पोस्ट ऑफिसमध्ये साध्या **पॅकर** पदावरून केली आणि अखेरीस **पोस्टमास्टर** म्हणून सेवानिवृत्त झाले. त्यांनी संगमनेर, कुकाणा साखर कारखाना, हरेगाव साखर कारखाना, श्रीरामपूर, अहमदनगर, बीड, अकोले, राजूर, कोतूळ अशा अनेक ठिकाणी नोकरी केली. वरील पैकी पहिल्या पाच ठिकाणी मला त्यांच्या बरोबर काही दिवस सुटीत राहण्याची संधी मिळाली. त्यांच्या मनमिळावू स्वभावामुळे त्यांनी मोठा मित्रपरिवार निर्माण केला. **वालझाडे, मेहुलकर, पांगारकर, सोमनाथ नेवासकर** हे त्यांचे खास मित्र होते. **आदरणीय मराळकर सर** त्यांच्या कार्याची नेहमीच प्रशंसा करत.

त्यांची साधी राहणी आणि शिस्तबद्ध जीवनशैली सर्वांसाठी प्रेरणादायी होती. धोतर नेसण्याची त्यांची खास लकब मला आजही आठवते.

आमच्या कुटुंबातील कोणतेही मोठे कार्य दिनकर आण्णांच्या सहभागाशिवाय पूर्ण होऊ शकत नव्हते. लग्नसमारंभ, सण-उत्सव किंवा कोणत्याही जबाबदाऱ्या—ते नेहमीच पुढाकार घेत. दिवाळीत त्यांनी मला आणलेले फटाके आणि वारंवार दिलेले कपडे आजही मनात कोरले गेले आहेत. विशेषतः, त्यांच्या जवळ असलेल्या **नव्या कोऱ्या एक रुपयांच्या नोटा** माझे लक्ष वेधून घेत असत. ओवाळणीसाठी त्या आमच्या बहिणींना मिळत, आणि त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद बघण्यासारखा असे!

त्यांना आपल्या कुटुंबाच्या भविष्याची नेहमीच काळजी असायची. मोठे बंधू आणि बहिणी यांच्या कल्याणासाठी त्यांनी पुढाकार घेतला. मी सर्वांत लहान आणि होतकरू असल्याने त्यांनी माझ्यासाठीही अनेक मित्रमंडळींकडे शब्द टाकून छोट्या-मोठ्या नोकऱ्या मिळवून दिल्या. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच मला पोस्ट ऑफिसमध्ये **पॅकर** म्हणून आणि नंतर **तलवार प्रेसमध्ये कंपोजिटर** म्हणून काम मिळाले. संगमनेर कॉलेजच्या प्राचार्यांशी ओळख होण्यासही त्यांचीच मदत झाली. ह्या संधींमुळेच माझ्या आयुष्याला दिशा मिळाली आणि पुढील वाटचालीस मोठी चालना मिळाली.

त्यांचं कुटुंब मोठं होतं—**तीन मुले आणि दोन मुली**. वहिनीही अतिशय कष्टाळू आणि करारी होत्या. दिनकर आण्णांची शिस्तप्रियता आणि कुटुंब एकत्र ठेवण्याची तळमळ सर्वांसाठी प्रेरणादायी होती. जीवनाच्या प्रवासात त्यांनी अनेक सुख-दुःखाचे प्रसंग पाहिले आणि त्यास समर्थपणे तोंड दिले. **आईची इच्छा होती की तिच्या चार मुलांच्या खांद्यावरच ती शेवटचा**

प्रवास करेल, आणि तिच्यासाठी हेच सर्वात मोठे समाधान होते. ती नेहमीच आमची ओळख **"माझे चार लाल"** अशीच करून द्यायची.

त्यांच्या सेवाभावी वृत्तीमुळे त्यांनी अनेकांच्या जीवनात प्रकाश टाकला आणि योग्य सल्ला दिला. **प्रामाणिकपणा आणि कष्टाळूपणा हेच त्यांचे खरे ध्येय** होते. त्यांना वाचनाची विशेष आवड होती आणि अभ्यासू वृत्ती हा त्यांचा विशेष गुण होता. देवधर्मावर त्यांची मर्यादित श्रद्धा होती, मात्र त्यांनी कधीही त्याचे अवडंबर माजवले नाही. त्यांच्या दैनंदिन आचरणात मात्र सेवा आणि निःस्वार्थ भाव असायचा.

त्यांच्या अखेरच्या दिवसांत **विस्मरणाचा आजार** त्यांना जडला. त्या काळात त्यांची थोडीफार सेवा करण्याची संधी मला मिळाली, पण त्यांची असहाय्यता पाहून मन हेलावून जायचं. संधी असूनही त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पा गोष्टी करता आल्या नाहीत, याची खंत वाटते. आज त्यांच्या आठवणी दाटून येतात, आणि डोळ्यांत नकळत अश्रू साचतात. त्यांच्या शिकवणीतील **संयम, प्रेम, सेवाभाव आणि निस्वार्थ कष्ट** हा आमच्यासाठी कायमचा ठेवा आहे.

दिनकर आण्णांच्या पवित्र स्मृतींना भावपूर्ण अभिवादन!

थोर तुझे उपकार!

तारामती – माझी सर्वात थोरली बहीण

(जन्म : १९३६ – स्वर्गवास : २० एप्रिल २००९)

कर्तृत्व, सोज्वळता आणि घरातील आपुलकी यांचा सुंदर संगम म्हणजे माझी सर्वात थोरली बहीण **तारामती**, आमच्यासाठी लाडकी *आक्का* ! तिच्या ठाम, सुसंस्कृत आणि शांत व्यक्तिमत्त्वाला समतोल राखणारा, विचारशील, सौम्य स्वभावाचा आणि शिस्तप्रिय जीवनशैली असलेला सहचर म्हणून माधवराव *दाजी* लाभले, हे तिच्या नशिबाचे खरे भाग्यच म्हणावे लागेल.

त्यांच्या संसारात परस्परांबद्दलचा सन्मान, आदर आणि जिव्हाळा नेहमीच जाणवत असे. आई, दादा आणि तात्यांना जेव्हा या जोडीदाराची ओळख झाली, तेव्हाच त्यांना उमगले की – *"आपली निवड किती अचूक आहे!"* माधवरावांसारखा उमदा, सुसंस्कृत जावई मिळाल्याचा आनंद घरातील प्रत्येकाच्या मनात दाटून आला. तारामती–माधवराव यांचे सौहार्दपूर्ण सहजीवन आमच्यासाठी नेहमीच आदर्शवत ठरले. त्यांच्या घरातील वातावरणात देशभक्ती, प्रामाणिकता आणि साधेपणाचा ठसा स्पष्ट जाणवत असे. अडचणीच्या काळात त्यांचे मार्गदर्शन आणि मोलाची साथ आम्हाला नेहमीच दिशा देणारी ठरली.

१९७१ चा निर्णायक प्रसंग

माणसाच्या आयुष्यात काही प्रसंग असे येतात, जे त्याच्या संपूर्ण भवितव्याला वळण देतात. काही जण संकटात धावून येतात, तर काही जण तोंड फिरवतात; पण दोन्हींचा ठसा मनावर कायम राहतो. माझ्या आयुष्यातही असा एक महत्त्वाचा प्रसंग १९७१ साली घडला.

ते दिवस आमच्यासाठी अत्यंत हलाखीचे होते. मी कॉलेजमध्ये तिसऱ्या वर्षात शिकत होतो. आई-वडील मोलमजुरी करून संसाराचा गाडा कसाबसा चालवत होते, त्यातून माझ्या शिक्षणाचा खर्च भागवणे म्हणजे मोठे आव्हानच होते. मी कॉलेजच्या प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली *"कमवा आणि शिका"* या योजनेतून शिकत होतो. शिकत असतानाच एखादी नोकरी मिळावी यासाठी निरनिराळ्या परीक्षा देत होतो. याच प्रयत्नांना यश आले आणि मला **स्टेट बँकेकडून नोकरीसाठी कॉल** आला.

लेखी परीक्षा आणि मुलाखत उत्तीर्ण होऊन नियुक्तीचे पत्र हातात आले तेव्हा घरात, नातेवाईकांत आणि माझ्या हितचिंतकांत आनंदाची लाट पसरली. सर्वांच्या मनात एकच भावना होती – *"आता सुभाषच्या घरचे हाल संपतील, आई-वडिलांना चांगले दिवस येतील."* परंतु खरी कसोटी अजून बाकी होती.

अडथळ्यांची कोंडी

बँकेच्या पत्रानुसार दोन अटींची पूर्तता करणे आवश्यक होते –

1. दोन प्रतिष्ठित व्यक्तींच्या शिफारशींची पत्रे.
2. सुरक्षा ठेव म्हणून **रु. १०००** रक्कम जमा करणे.

पहिली अट मी सहज पूर्ण केली, पण दुसरी अट माझ्यासाठी अत्यंत कठीण ठरली. त्या काळी आमची आर्थिक परिस्थिती इतकी नाजूक होती की एवढी मोठी रक्कम एका दमात जमवणे जवळजवळ अशक्य होते.

मी काही नातेवाईकांकडे मदतीसाठी धाव घेतली. परंतु, माझ्या नोकरीच्या अनिश्चिततेचा विचार करून की काय, किंवा इतर काही कारणाने अनेकांनी असमर्थता दर्शवली. त्या क्षणी झालेली निराशा आजही विसरता येत नाही.

मी कॉलेजच्या प्राचार्यांकडे गेलो. त्यांनी माझी परिस्थिती समजून घेतली आणि बँकेच्या शाखा व्यवस्थापकांना फोन करून *"हप्त्यांनी भरता येईल का?"* अशी शिफारस केली. अगदी वैयक्तिक हमी द्यायलाही तयार झाले. पण बँकेचे नियम कठोर असल्याने काहीही मार्ग निघाला नाही.

आक्का–दाजींचा आधार

संकटाचा डोंगर समोर उभा असताना मनात एकच नाव उमटले – माझी मोठी बहीण *आक्का* आणि मेहुणे माधवराव *दाजी*. आई-वडिलांना त्यांच्याकडे मदत मागायला संकोच वाटत होता, पण परिस्थिती इतकी गंभीर होती की वेळेत पैसे न भरल्यास नोकरीच निसटेल अशी भीती मनाला सतावत होती.

मी धैर्य गोळा करून आक्काकडे गेलो. माझी व्यथा ऐकताच तिने परिस्थितीचे गांभीर्य ओळखले आणि क्षणाचाही विलंब न करता दाजीकडे संपूर्ण प्रसंग मांडला. त्यांचीही आर्थिक परिस्थिती खास नव्हती, तरी दोघांनीही मला धीर देत दुसऱ्या दिवशी उपाय सांगण्याचे आश्वासन दिले.

दुसऱ्याच दिवशी दाजी मला *हत्ती छाप* कारखान्याचे मालक श्री. गणेशकाका सराफ यांच्याकडे घेऊन गेले. दाजींनी आपल्या विश्वासार्हतेवर

हातउसने रक्कम घेतली आणि ती मला दिली. त्यांच्या या वेगवान कृतीमुळे मी वेळेत **रु. १०००** जमा करून सर्व कागदपत्रांची पूर्तता केली आणि बँकेत हजर झालो. तो दिवस माझ्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा आणि माझे भविष्य बदलणारा क्षण ठरला.

कृतज्ञतेचा अमोल ठेवा

आज इतक्या वर्षांनंतरही त्या प्रसंगाची आठवण झाली की अंगावर काटा येतो. माझ्या आयुष्याला दिशा देणाऱ्या त्या रकमेपेक्षा त्यांच्या वेळेवर दिलेल्या साथीतच खरा अर्थ दडला आहे. मीही त्यावेळी कबूल केल्याप्रमाणे, बँकेत मिळालेल्या पहिल्या पगारातील एकही पैसा घरी न देता केवळ तीन महिन्यांत त्यांनी दिलेले पैसे परत फेडले.

परंतु, त्यांनी केलेल्या या उपकाराचे ऋण मात्र मी आयुष्यभर फेडू शकणार नाही. त्या दोघांनी केवळ आर्थिक मदतच केली नाही, तर माझ्या आयुष्यात एक अमिट शिकवण दिली – **संकटाच्या वेळी धावून जाणे हेच खरे नात्याचे मोल आहे.**

माझी आक्का आणि दाजी यांनी माझ्या मनात कायमचे घर केले आहे. त्यांच्या स्मृतींना मी मनःपूर्वक त्रिवार वंदन करतो.

ही कथा केवळ एका मदतीची नाही, तर कुटुंबातील आत्मीयतेची, संकटातील धैर्याची आणि योग्य वेळी दिलेल्या हातभाराची जिवंत साक्ष आहे. माझ्या आयुष्यातील हा प्रसंग नेहमी आठवण करून देतो की – **खरी संपत्ती म्हणजे आपल्यावर निस्सीम प्रेम करणारी आपलीच माणसं!**

विष्णुपंत धारणकर यांची वंशावळ - पिढ्यानुसार मांडणी

🌳 मूळ पिढी

- **मुक्ताजी**
  ↓ पुत्र : **मार्तंड**

🌳 दुसरी पिढी (मार्तंड यांची अपत्ये)

1. **विष्णू** – पत्नी शांताबाई (माहेर चांगटे)
2. **आबा** (अविवाहित)
3. **सीताराम** – पत्नी सुंदरबाई (माहेर कापरे)

🌳 तिसरी पिढी (विष्णूपंत यांच्यापासून पुढील वंश)

→ **मुले:** मधुकर, भास्कर, दिनकर, ताराबाई, कुमुदिनी, सुमन, लतिका, सुभाष

1. मधुकर – पत्नी रुक्मिणी (माहेर ढवण, सिन्नर)

मुले: शोभा, अनिल, उषा, शशिकला, महेंद्र

- **शोभा – पती अंबादास सरोदे (सिन्नर)**

- जितेंद्र– पत्नी गीता ⟶ शौर्य, शिव
- निलेश– पत्नी शितल ⟶ तन्मय, हर्षदा
- मनीषा– पती शाम पोकळे ⟶ निखिल, आदित्य
- अश्विनी– पती मोहन त्रंबके
- संजना– पती सुनील धारणकर (नाशिक) ⟶ आयुष, श्रुती

- **अनिल – पत्नी नीता माहेर कनोजे**
  - सुनील– पत्नी राधिका ⟶ भूमी, गार्गी, शंभूराजे
  - संगीता– पती अमित भागवत ⟶ अनामिका, कार्तिक
- **उषा – पती दीपक वेडे (संगमनेर)**
  - गणेश– पत्नी जान्हवी ⟶ तृषा, प्रांश
  - संगीता– पती संदीप दातरंगे ⟶ साक्षी
  - शिल्पा (प्रियंका)– पती प्रदीप चिंचकर (जामनेर) ⟶ आर्यन, स्वामिनी
  - धनश्री– पती निलेश अहिरराव (संभाजीनगर) ⟶ तनय
- **शशिकला – पती उत्तम निचळ (सिन्नर)**
  - संदीप– पत्नी प्रियंका ⟶ प्रियांश
  - राजू
  - सोपान– पत्नी शुभांगी ⟶ इशान, ईश्वरी
- **महेंद्र – पत्नी भारती (माहेर गोवर्धने)**
  - सनी, अजय

2 भास्कर – पत्नी यशोदा (माहेर सावेकर)

- धर्मेंद्र– पत्नी छाया माहेर गवंडी

- यश
- पूजा– पती संतोष लोंढे ⟶ तनिष्का, नित्या

3 दिनकर – पत्नी सुभद्रा (माहेर माटे, केंदूर पाबळ)

- सुनील– पत्नी आशा ⟶माहेर वेडे हर्षल– पत्नी श्रद्धा ⟶ सान्वी
- वंदना– पती सुनील दिवाणे ⟶ स्वप्नाली (सरोदे), सर्वेश
- राजेंद्र– पत्नी जयश्री ⟶माहेर सरोदे प्रणोती, ज्ञानदा
- विनीत– पत्नी अर्चना ⟶माहेर मंद्रे अथर्व
- मंजुषा– पती राजेश सातपुते ⟶ प्रणव

4 सुभाष – पत्नी सुनीता (माहेर खडमकर, नाशिक)

- राहुल– पत्नी उल्का (माहेर रानभरे) ⟶ श्रेया
- अतुल– पत्नी माधवी (माहेर लहाने) ⟶ अन्वी

5 ताराबाई – पती माधवराव सांगळे

- अलका – पती संभाजी लुंगे
  - वर्षा – पती अनिल पाटेकर (मंचर) ⟶ मयूर (पत्नी सई ⟶ कार्तिक, ऋषी)
  - मुकेश – पत्नी कल्पना ⟶ तनिष्क
  - स्मिता – पती किरण भागवत (येवला) ⟶ अक्षरा (पती कल्पेश बोरा), वैष्णवी (पती स्वप्नील सरोदे), ओम

    - सीमा – पती मोहन माळवदकर ⟶ मिलिंद
- गिरीश – पत्नी सुनिता माहेर मालवदकर
    - रसिका – पती रितेश पाचपोर
    - श्रुतिका – पती रोहित बारगजे ⟶ शारवी
- सतीश – पत्नी वैशाली ⟶माहेर शिंगाडे मृणाल (पती सौरभ नेरकर)
- मंगेश – पत्नी सविता ⟶माहेर पाठक माधवी (पती श्रेयस खामकर)
- वीरेश – पत्नी रेणुका ⟶ वेद
- अंजली – पती अनिल उगले (अपत्ये)

6 कुमुदिनी – पती दत्तात्रय खोपे

7 सुमन – पती काशिनाथ ठोंबरे

- संजय – पत्नी वृंदा ⟶ गणेश
- भारती – पती विश्वनाथ गवंडी ⟶ प्रमोद, पूनम
- नंदा ⟶ अमोल सरोदे, माधवी गवळी, पूजा आचारी

8 लतिका – पती सारंगधर साळी (वेडे)

- संगीता – पती राजेश गणाचार्य ⟶ दीक्षा
- संतोष – पत्नी सुजाता ⟶ आरुषी

सीतारामपंत धारणकर यांची वंशावळ

– सीतारामपंत पत्नी सुंदरबाई (माहेर कापरे)

मुले : प्रभा, सुरेश, रमेश, सोमनाथ, सतीश, मंगल

- **प्रभा– पती बापूसाहेब दातरंगे** ⟶
  मुले- उमेश पत्नी अर्चना , उज्वला (दिवटे)
- **रमेश पत्नी –मंगल (माहेर दळवी)** ⟶
  मुले
  आशिष **पत्नी** –वेदा ⟶ मुले आरुषी, अनघा;
  सचिन– **पत्नी** अंजली ⟶ मुले अर्जुन;
  प्रीती **पती** –राहुल काजवे (मुले) अद्विता
- **सुरेश– पत्नी सुमन** माहेर गेटम⟶
  मुले
  चंद्रशेखर– **पत्नी** श्रद्धा ⟶ मुले ऋतुजा, ऋग्वेद;
  राजेश– **पत्नी** स्वाती ⟶ मुले इशिता;
  प्रशांत– **पत्नी** अश्विनी ⟶ मुले आदित्य
- **सोमनाथ– पत्नी मीनाक्षी** ⟶माहेर घावटे
- मुले- प्रियंका, परेश, प्रथमेश
- **सतीश– पत्नी संजीवनी माहेर काळे** ⟶
- मुले धनश्री पती –अतुल जालींद्रे (मुले); रेवा, श्रिया
  निखील– **पत्नी** गीता ⟶ रुही
- **मंगल– पती पाटेकर** ⟶
  अमोल, स्वाती–राजेश वाव्हळ

सीतारामपंत (तात्या) – सुंदरबाई (काकू)

प्रभावती

सुमन–सुरेश

रमेश – मंगला

मीनाक्षी–सोमनाथ

मंगल



सतीश– संजीवनी

सुभाष विष्णू धारणकर (सुविधा)

जन्म: ११ जानेवारी १९५१, संगमनेर

अर्थशास्त्रातील पदवी, डी.सी.एम. (पुणे विद्यापीठ) व C.A.I.I.B. या शिक्षणाच्या बळावर त्यांनी ३९ वर्षे भारतीय स्टेट बँकेत अधिकारी व वरिष्ठ अधिकारी म्हणून कार्य केले. व्यवस्थापक म्हणून त्यांच्या नेतृत्वाखाली शाखांना सर्वोच्च श्रेणी आणि मंडळ लेखापरीक्षक म्हणून मुख्य महाव्यवस्थापकांकडून गौरव प्राप्त.

साहित्य व पत्रकारिता

- श्री जिव्हेश्वर समाचार मासिकाचे कार्यकारी संपादक
- २०२४ च्या दिवाळी अंकाचे निमंत्रित संपादक (श्री जिव्हेश्वर समाचार)
- सध्या SBIPA मासिक "संवाद" चे सहसंपादक
- महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, सकाळ, लोकप्रभा, इ-अभिव्यक्ती इत्यादी प्रमुख प्रकाशनांत लेख प्रसिद्ध

सामाजिक कार्य

- लेक टाऊन ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव; COVID काळात ७२ व्हिडिओ उपक्रम यूट्यूबवर उपलब्ध करून दिले
- ज्येष्ठांना व्हिडिओ मेकिंगमध्ये पारंगत केले
- जिव्हेश्वर प्रतिष्ठान व विद्यार्थी विकास मंचातून गरजू विद्यार्थ्यांना सहाय्य
- प्लास्टिक निर्मूलन मोहिमेत दशकभर सातत्यपूर्ण प्रयत्न
- पेमावि १९६९ SSC वर्गमित्रांचा सुवर्ण महोत्सवी मेळावा (२०१९) आयोजित

सांस्कृतिक आणि बहुमुखी प्रतिभा

लेखन, वाचन, गायन, चित्रकला, सिंथेसायझर वादन या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान पुरस्कार व गौरव

- जिव्हेश्वर प्रतिष्ठान कार्यकर्ता कृतज्ञता गौरव (२०१९)
- जिव्हेश्वर प्रतिष्ठान सन्मान (२०२२, २०२४)
- प्रवरा तीर्थ साहित्यिक सन्मान - पेमावी पुरस्कार
- स्वकुळ साळी मराठी साहित्य संमेलन, सोलापूर (२०२४) - सन्मानचिन्ह
- ज्येष्ठ नागरिक संघ, लेक टाऊन - दशकपूर्ती अंकाबद्दल विशेष गौरव
- ILC आंतरराष्ट्रीय संस्थेच्या निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांक

संदेश

"सतत शिकत राहा, समाजाशी जोडलेले राहा आणि आयुष्याला अर्थपूर्ण बनवा."